सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १३४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १९ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## देशात लवकरच इंग्रजीत बोलणाऱ्यांना लाज वाटायला लागेल; अमित शाह यांचे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ नवी दिल्ली**

व्यवहारात इंग्रजी भाषेचं वर्चस्व वाढत असून, याचं संदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मोठं विधान केले. जे लोक इंग्रजीमध्ये बोलतात, त्यांना इंग्रजी बोलण्याची लाज वाटू लागेल, असे शाह म्हणाले. राष्ट्राची ओळख भारतीय भाषा असल्याचेही ते म्हणाले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह माजी सनदी अधिकारी आयएएस आशुतोष अग्निहोत्री यांच्या पुस्तक कार्यक्रमाला उपस्थित होते. 'मै बूंद स्वंय, खुद सागर हूं' या पुस्तकाचे प्रकाशन अमित शाह यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमात बोलताना अमित शाह म्हणाले, 'देशाचा आत्मा भाषा असतात. भारतातील भाषांना पुनर्वैभव प्राप्त करून देण्याचा आणि मातृभाषेबद्दल अभिमान बाळगून जगाचे नेतृत्व करण्याची वेळ आली आहे.'



**भाषा आपल्या संस्कृतीची रत्ने**

'देशात जे इंग्रजीमध्ये बोलतात, त्यांना इंग्रजी बोलण्याची लवकरच लाज वाटायला लागेल, असा समाज निर्माण करणे आता फार दूर राहिलेले नाही. ज्यांचा संकल्प दृढ आहे, तेच बदल घडवून आणू शकतात. माझे मत असे आहे की, आपल्या देशातील भाषा आपल्या संस्कृतीची रत्ने आहेत. आपापल्या भाषांशिवाय आपण खरे भारतीय म्हणून राहू शकत नाही', अशी भूमिका अमित शाहांनी यावेळी मांडली.

## 'काँग्रेसमध्ये नेत्यांचं खच्चीकरण': जयश्री पाटलांच्या पक्षप्रवेशावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१९मुंबई**

राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या नातसून आणि कट्टर काँग्रेस समर्थक परिवाराच्या सदस्य जयश्री पाटील यांनी बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उपाध्यक्षा जयश्री पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत बंडखोरी केली होती. आता अखेर त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. यामुळे सांगलीच्या राजकारणात भाजपाला बळकटी मिळाली असून, कट्टर काँग्रेस समर्थक असलेल्या परिवारात आता फूट पडली आहे.




जयश्री पाटील या काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री दिवंगत मदन पाटील यांच्या पत्नी आहेत. काही दिवसांपूर्वीच उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जयश्री पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी वसंतदादा पाटील यांच्या कुटुंबाला भाजपासोबत आणण्यासाठी भाजपाच्या राज्यस्तरीय नेत्यांनी जयश्री पाटील यांच्याशी संपर्क साधला होता. भाजपाच्या या प्रयत्नांना आता यश आलं असून, वसंतदादा पाटील यांच्या नातसून जयश्री पाटील यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे.

**काँग्रेसचं नेतृत्व दिशाहीन झालं – मुख्यमंत्री**

यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सांगलीतील एक मोठं कुटुंब भाजपामध्ये प्रवेश करणार होतं, त्यांनी प्रवेश केला. भाजपामध्ये जे काही पक्षप्रवेश होतात, त्या सर्वांचा पक्षप्रवेश प्रदेशाध्यक्षांच्या उपस्थितीत केला जातो. मात्र, वसंतदादा पाटील यांच्या कुटुंबाचा वारसा असल्यानं मी स्वतः देखील या पक्षप्रवेशाच्या सोहळ्याला आलो. भाजपा हा केवळ पक्ष नसून एक परिवार आहे. जयश्री पाटील आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना इथं परिवारासारखीच वागणूक मिळेल. त्यांनी आता प्रवेश केला असला, तरी, समान संधी, समान जबाबदारी दिली जाईल. ते आमचं कर्तव्य आहे. काँग्रेसचं नेतृत्व दिशाहीन झालं आहे. काँग्रेसनं समाजहित, देशहित या सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांना आता बगल दिली. त्यामुळे जे नेते, कार्यकर्ते समाजाशी, जनतेची जोडले आहेत, त्यांचं खच्चीकरण होत आहे असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी यावेळी केला.

## पीओपी मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावही वाढवा

### मूर्तिकारांकडून गणेशोत्सवाची जोरदार तयारी सुरु



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

दीडएक महिन्यावर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाची जोरदार तयारी मूर्तिकारांकडून सुरू झाली असून, उच्च न्यायालयाने दिलेल्या पीओपीच्या परवानगीनंतर आता मूर्तीकाम वेगाने सुरू झाले आहे. तत्पूर्वी पीओपीच्या मूर्तीमुळे जल प्रदूषणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर येऊ नये, म्हणून अधिकाधिक छोट्या मूर्तींच्या विसर्जनासाठी पालिकेने मोठ्या प्रमाणावर कृत्रिम तलावांच्या निर्मितीवर भर द्यावा. गणेशोत्सवाची मार्गदर्शन तत्वे जारी करताना या प्रक्रियेमध्ये गणेश मूर्तिकार संघटनांनाही सामावून घ्यावे, असे मूर्तिकारांनी सांगितले.

उच्च न्यायालयाने पीओपीच्या मूर्तींना परवानगी दिल्यानंतर मूर्तिकारांनी काही मुद्द्यांकडे लक्ष वेधले आहे. श्रीगणेश मूर्तिकार कामगार संघटनेचे अध्यक्ष प्रशांत देसाई यांनी सांगितले, शासनाने मार्गदर्शक तत्वे तयार करताना मूर्तिकार संघटनांना सहभागी करून घ्यावे. जेणेकरून काही निर्णय घेताना मूर्तिकारांचे म्हणणे विचारात घेतले जाईल. यातून सुवर्णमध्य निघावा ही अपेक्षा आहे.

सरकारी अधिकाऱ्यांची इच्छा असेल, तर सगळ्या गोष्टी शक्य आहेत. पीओपीचा पुनर्वापर होऊ शकतो. यासाठी एखादा पथदर्शी प्रकल्प उभा केला आणि विसर्जित केलेल्या मूर्ती बाहेर काढून पीओपीचा पुनर्वापर करता येऊ शकतो. कृत्रिम तलावांतील मूर्तींचा पुनर्वापर होऊ शकतो. त्यामुळे प्रदूषणही होणार नाही. पीओपीचे काम करणाऱ्या मूर्तिकारांना शाडूच्या मातीचे मूर्तिकाम करता येत नाही. दोन्ही मुद्दे वेगळे आहेत, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

## शेतीशाळांच्या किट खरेदीत १.२० कोटीचा भ्रष्टाचार : आ. सुरेश धस यांचा गंभीर आरोप

### कृषी आयुक्तांकडे तक्रार, जेडीए लहाळे अडचणीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

कृषी विभागातील काही चर्चित अधिकाऱ्यांविरोधात आ. सुरेश धस चांगलेच आक्रमक झाले आहेत. यामध्ये अमरावतीचे विभागीय कृषी सहसंचालक (जेडीए) प्रमोद लहाळे यांच्या काही प्रकरणांची पुराव्यासह तक्रार १८ जूनला कृषी आयुक्तांकडे त्यांनी केली. यामध्ये शेतीशाळांच्या किट खरेदीत १.२० कोटीचा भ्रष्टाचार लहाळे यांनी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

लहाळे यांच्या अनियमिततेच्या तीन तक्रारी आ. धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रधान सचिव (कृषी) विकासचंद रस्तोगी व कृषी आयुक्त सूरज मांढरे यांच्याकडे केल्या आहेत. या सर्व प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. लहाळे यवतमाळ येथे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी असताना जिल्ह्यातील शेतीशाळांचे किट खरेदीसाठी शासननियम डावलून ऑर्डर दिली. पुरवठादाराने किटमधील एकाही वस्तूचा पुरवठा न करता लहाळे



यांना बिले दिले व पुरवठादारास २०२५ मध्ये ५० लाख, सन २०२४ मध्ये ७७ लाख रुपयांचे किट कागदावर खरेदी दाखवून १.२० कोटींचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप आ. धस यांनी तक्रारीत केला आहे.

मला माहिती पुरवित असल्याच्या संशयावरून काही अधिकाऱ्यांच्या निलंबनाचे प्रस्ताव, विभागीय चौकशीचे प्रस्ताव शुल्लक कारणास्तव मंत्रालयात सादर करीत असल्याचा घणाघात आ. धस यांनी तक्रारीत केला. याबाबत जेडीए प्रमोद लहाळे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी आरोप नाकारले व याबाबत अधिक बोलण्यास नकार दिला.

**कृषी सहायक, पर्यवेक्षकांच्या बदल्यात भ्रष्टाचार**

अमरावती जेडीए कार्यालयात स्मार्ट प्रकल्पाचे नोडल अधिकारी प्रशांत नाईक यांना अधीक्षक पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला, व त्यांच्या माध्यमातून कृषी सहायकाचे बदलीसाठी १ लाख व कृषी पर्यवेक्षकासाठी २ लाख रुपये गोळा करण्यात आल्याचा आरोप आ. धस यांनी तक्रारीत केला आहे.

> अमरावती जेडीए प्रमोद लहाळे यांच्यासंदर्भात मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून एसआयटी स्थापन करण्यासाठी निवेदन दिले आहे. चर्चा सकारात्मक झाली.
>
> **सुरेश धस, आमदार**

यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानात २२ कोटींचा भ्रष्टाचार झाला., त्यामध्ये नाईक यांच्यावर ३.५० कोटींची वसुली काढण्यात आली. लहाळे यांनी तत्कालीन कृषिमंत्री यांना चुकीची माहिती देऊन नाईक यांची पदोन्नती एसएओ पदावर केल्याचा आरोप तक्रारीत आहे. नाईक यांनी मात्र हे सर्व आरोप फेटाळले आहे.

## पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी टोलमाफी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ मुंबई**

यंदाही आषाढी वारीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी राज्य सरकारने टोलमाफी केलीय. ही टोलमाफी १८ जून ते १० जुलै या कालावधीत लागू असणार आहे. सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याबाबतचे परिपत्रक काढण्यात आलंय. पंढरपूरच्या जाणाऱ्या १० पालखीमार्गावर ही टोलमाफी असणार आहे.

वारकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा आणि वारी मार्गावरील रस्ते दुरुस्ती या बाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली होती. ही बैठक २८ मे रोजी पार पडली होती. या बैठकीत वारीला जाणाऱ्या वाहनांसाठी टोलमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला. टोलमाफीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या पालख्यांवर, भाविक आणि वारकऱ्यांना आषाढी एकादशी २०२५ गाडी क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर नमूद करणं आवश्यक आहे.

वाहनांच्या आणि पालखीच्या संख्येनुसार स्टीकर्स परिवहन विभाग, वाहतूक पोलीस, पोलीस संबंधित आरटीओ यांच्याशी समन्वय साधून पोलीस स्टेशन, वाहतूक पोलीस चौक्या, आरटीओ ऑफिसमध्ये उपलब्ध आहेत. देण्यात आलेले पास परतीच्या प्रवासासाठी ग्राह्य धरण्यात येतील याप्रमाणे स्टीकर्स तयार करण्यात यावेत, असेही मुख्यमंत्री फडणवीसांनी गृह विभागामार्फत सर्व पोलीस अधिकाऱ्यांना अवगत करण्याच्या सूचनाही प्रशासनाला दिल्यात.

## राजेंद्र शिंगणेंच्या बंगल्यात आग लागून किचन खाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९बुलढाणा**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या बुलढाणा येथील बंगल्यात भयंकर स्फोट झाला. त्यामुळे किचनमध्ये आग लागली. संपूर्ण साहित्य जळून खाक झालंय. शुक्रवारी रात्री हा स्फोट झाला. परंतु घरात कोणीही नसल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु, किचन आणि त्यातलं साहित्य पूर्णतः जळून खाक झाले आहे. रात्री अचानक किचनच्या बाजूने जोरात स्फोटाचा आवाज ऐकू आला.



त्यानंतर किचनला आग लागल्याचं समोर आलं. अग्निशमन दलाच्या जवानांनी त्वरित आग आटोक्यात आणली. आगेमुळे किचनमधील सर्व साहित्य ज्यात ॲसी, उपकरणे, भांडी, अन्नपदार्थ यांचं मोठं नुकसान झालंय. घटनेवेळी डॉ. शिंगणे आणि त्यांच्या कुटुंबीय बाहेरगावी होते. घरात कोणीच उपस्थित नव्हते. त्यामुळे सुदैवाने जीवितहानी टळली आहे.

## नाशिकमध्ये मुसळधार पावसाचा कहर! गोदावरी नदीला पूर

### रस्ते जलमय, वाड्या-वस्त्यांमध्ये पाणी शिरलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नाशिक**

नाशिकला मुसळधार पावसाने झोडपलं आहे. मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीला पूर आला आहे. सकाळपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीला पूर आल्याची माहिती मिळत आहे. गोदावरीला यंदाच्या हंगामातील पहिला पूर आहे. या गोदावरी नदीच्या पुरात कार बुडाल्याची घटना घडली आहे. नाशकात रामकुंड परिसरातील अनेक मंदिरांना पुराच्या पाण्याने वेढा घातला आहे.




नाशिकला मुसळधार पावसाने झोडपून काढलं आहे. या मुसळधार पावसामुळे मान्सून पूर्व कामाजा फज्जा उडाला आहे. पावसामुळे अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचलं आहे. रस्त्यांना तळ्याचं स्वरुप, गुडघाभर पाण्यातून वाहचालकांना वाट काढावी लागत आहे. धुव्वाधार पावसाने नाशिक शहराला झोडपलं आहे. नाशिकमधील गडकरी चौकात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यानं वाहनचालकांना पाण्यातून वाट काढताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

नाशिकच्या दारणा धरणातून पाणी सोडलं आहे. नाशिकमध्ये दारणा धरणातून दुपारी तीन वाजेपासून दारणा धरणातून ११०० क्युसेक वेगानं पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला आहे. दारणा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू असल्याने धरणाच्या पाणी पातळीत वाढ धाली आहे. मुसळधार पावसामुळे दारणा धरण ५० टक्के भरलं आहे. त्यामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला. पावसाचा जोर वाढल्यास धरणातून पाण्याचा विसर्ग आणखी वाढवला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शिवसेनेच्या दोन्ही गटांमध्ये माजी आमदारांसाठी रस्सीखेच; 'रात्रीस खेळ चाले'चा सिलसिला सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

आगामी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळातील हालचालींना वेग आल्याचे पाहायला मिळत आहे. ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागतील, असा कयास बांधला जात आहे. विधानसभेतील विजयाची लय कायम ठेवण्याचा प्रयत्न महायुतीकडून केला जात आहे. तर महाविकास आघाडी पराभवाचा वचपा काढण्यासाठी सर्व जोर पणाला लावत आहे. परंतु, यातच ठाकरे गटाला पडलेले पक्ष गळतीचे भगदाड वाढताना पाहायला मिळत आहे.

शिंदेसेना शिंदे गट व उद्धवसेना हे दोन्ही पक्ष वर्धापनदिनाच्या निमित्ताने जोरदार शक्तिप्रदर्शन करत आहेत. विशेष करून मुंबईत पालिका निवडणुकीपूर्वी या सोहळ्यांना महत्त्व आहे. विधानसभा निवडणुकीत दारूण पराभव झाल्यानंतर एकामागून एक माजी नगरसेवक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उद्धव ठाकरे यांना जय महाराष्ट्र करत शिवसेना शिंदे गट, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात सामील होताना दिसत आहेत. पक्षाला लागलेली गळती थांबताना दिसत नाही. परंतु, आता ही गळती रोखण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. पक्ष सोडून जाऊ नये, यासाठी ठाकरे गटाचे नेते, पदाधिकारी शर्थीचे प्रयत्न करत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. अन्यथा महापालिका निवडणुकीत ठाकरे गटासमोर मोठे आव्हान उभे राहू शकते, असा कयास बांधला जात आहे.

## संपादकीय ......

# झेप नव्या पर्वासाठी

*भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे लवकरच ॲक्सिओम स्पेसच्या एक्स-४ मिशनद्वारे आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकाचा (आयएसएस) दौरा करणारे पहिले भारतीय नागरिक ठरणार आहेत. सुमारे ४० वर्षांनंतर पहिल्यांदा भारतीय अंतराळवीर अंतराळात प्रवास करतोय. ॲक्सिओम स्पेस ४ वर एक प्रयोग मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये अंतराळवीर इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले आणि संगणकांशी कसा संवाद साधतात, यावर केंद्रित असणार आहे. यामागे 'इस्रो'चा उद्देश अंतराळातील संगणकीय स्क्रीन वापरामुळे शरीरावर आणि मेंदूवर होणार्या परिणामांचे विश्लेषण करणे आहे.*

*भारतीय वायुसेनेचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला लवकरच इतिहास रचणार आहेत. ते ॲक्सिओम मिशन-४ अंतर्गत स्पेसएक्सच्या ड्रॅगन कॅप्सूलमधून आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकाची यात्रा करणार आहेत. त्यांच्या निमित्ताने पहिल्यांदाच भारतीय वैमानिक खासगी अंतराळ मोहिमेत सहभागी होणार आहे. ड्रॅगन हे एलन मस्क यांच्या स्पेसएक्स कंपनीने विकसित केलेले पुनर्वापरायोग्य अंतराळयान आहे. अंतराळयात्रेकरू व साहित्य पृथ्वीवरून आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकापर्यंत पोहोचवणे आणि सुरक्षितपणे परत आणणे, हा या यानाचा उद्देश आहे. या यानाचा आकार कॅप्सूलसारखा असल्यामुळे याला ड्रॅगन कॅप्सूल म्हणतात.*

*अलीकडेच भारतीय वंशाची अंतराळयात्री सुनीता विल्यम्स ८ महिन्यांनंतर याच ड्रॅगन कॅप्सूलच्या सहाय्याने अंतराळातून पृथ्वीवर परत आली होती. त्यांच्या सोबत आणखी तीन अंतराळयात्री होते. एक्स-४ ही स्पेसएक्सची ५३ वी ड्रॅगन मोहीम असून, १५ वी मानवी अंतराळ मोहीम आहे. या मोहिमेत शुभांशू शुक्ला यांच्यासोबत कमांडर पेगी व्हिटसन (अमेरिका), मिशन स्पेशालिस्ट स्लावोस उज्नांस्की (पोलंड), मिशन स्पेशालिस्ट टिबोर कापू (हंगेरी) हे अन्य तीन आंतरराष्ट्रीय अंतराळवीर सहभागी असणार आहेत.शुभांशू शुक्ला ज्या कॅप्सूलमध्ये प्रवास करणार आहेत, ते क्रू ड्रॅगन आहे. ड्रॅगन कॅप्सूल स्पेसएक्सचा फाल्कन-९ रॉकेट अंतराळात सोडतो. रॉकेट काही उंचीवर पोहोचल्यानंतर ड्रॅगन कॅप्सूलला कक्षेत (ऑर्बिटमध्ये) सोडतो. हे कॅप्सूल पूर्णतः स्वयंचलित (ऑटोनॉमस) आहे. म्हणजेच, ते स्वतःहून अंतराळ स्थानकाशी जोडते आणि आपली उड्डाण दिशा व नियंत्रण सांभाळते; मात्र आपत्कालीन स्थितीत हस्तक्षेप करण्यासाठी वैमानिकाची गरज असते आणि ते काम शुभांशू करणार आहेत. शुभांशू शुक्ला सुमारे १४ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकावर असतील. ते या मोहिमेत वैमानिकाची भूमिका निभावतील आणि ड्रॅगन कॅप्सूलच्या उड्डाण, डॉकिंग आणि परतीच्या प्रक्रियेवर लक्ष ठेवतील. त्यांच्या सोबत अमेरिका, हंगेरी आणि पोलंड येथील अंतराळयात्री असतील. ही मोहीम पूर्णतः खासगी स्वरूपाची असून ॲक्सिऑम स्पेस या कंपनीकडून तिचे संचालन केले जात आहे.*

# जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी घेतला मोर्शी तहसील कार्यालयातील विविध कामकाजाचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-** गट विकास अधिकारी यांनी घरकुल लाभार्थ्यांच्या घरकुल अद्यावत फोटोसह टॉपिंग याद्या तहसील कार्यालयात त्वरित सादर कराव्यात. तसेच तहसीलदार यांनी घरकुल लाभार्थ्यांना रेती वाळू वाटप करणे बाबत तातडीने रॉयल्टी देऊन त्यांना एक ब्रास प्रमाणे वाळू उपलब्ध करून द्यावी , असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मोर्शी तहसील कार्यालय येथे नुकतेच दिले.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी घेतला मोर्शी तहसील कार्यालयातील विविध कामकाजाचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. घरकुलसाठी रेती रॉयल्टी वाहतूक पास दिल्यानंतर त्यांच्या नोंदी घेणे व रेती उचल केल्यानंतर या पास लाभार्थ्यांकडून परत घेण्यात याव्यात.

घरकुल रॉयल्टी कोणत्याही परिस्थितीत गैरवापर होणार नाही याची ग्राम महसूल अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीबाबत सर्व ग्राम महसूल अधिकारी मंडळ अधिकारी यांनी पथक निहाय कारवाई करावी.

गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांची महाखनिज प्सद्वारे तपासणी करावी, अवैध वाहतूक आढळून आल्यास त्वरित कारवाई करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी ग्रीस्टॅगचा गावनिहाय आढावा घेतला. तसेच



गावनिहाय पी एम किसान लाभार्थी यांची नोंदणीबाबत माहिती घेतली. यामध्ये गावनिहाय नियोजन करून तीन कॅंडरमध्ये विभागणी करण्याबाबत सूचना दिल्या. तहसीलदार ,गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांनी नियोजन करून कृषी सेवक, ग्रामसेवक व ग्राम महसूल अधिकारी यांनी शेतकऱ्यांपर्यंत पोहचून काम पूर्ण करून घ्यावे. ही कामे ३० जून २०२५ पर्यंत पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.


संजय गांधी श्रावण बाळ योजनेबाबत डीबीटी पोर्टलवरील कामे ३० जूनपर्यंत पूर्ण करावे. नैसर्गिक आपत्तीविषयक घरपडझडीचे अनुदान तातडीने वाटप करावे.

शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामा करावे व यादी तयार करावी. तसेच सामायिक शेतीबाबत संमती पत्र तिथेच घेण्याबाबत ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना निर्देश देण्यात आले. अनुदान वाटप करताना पेन्डिग इ-केवायसीचे काम तातडीने पूर्ण करावे, असेही जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी सांगितले. मोर्शी येथील पर्यटन केंद्रांला श्री. येरेकर यांनी भेट दिली. तेथे त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर नगरपरिषद अंतर्गत डंपिंग डेपो येथील कचरा व्यवस्थापन केंद्राला भेट देवून पाहणं केली.

# तालुका पालक अधिकाऱ्यांकडून आज पहिला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-** तालुका स्तरावरील समस्या आणि यंत्रणांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सात तालुका पालक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. त्यानुसार नियुक्त करण्यात आलेल्या सात अधिकाऱ्यांनी आज पहिला तालुका दौरा आपल्या क्षेत्रात केला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी स्वत: मोर्शी आणि वरूड तालुक्यात दौरा केला. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर हे मोर्शी, निवडणूक उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे दर्यापूर, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे नांदगाव खंडेश्वर, रोहयो उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर ज्ञार चिखलदरा, महसूल उपजिल्हाधिकारी विवेक जाधव अचलपूर, जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्रध्दा उदावंत तिवसा, विशेष भुसंपादन अधिकारी प्रसन्नजित चव्हाण धामणगाव रेल्वे



तालुक्यांना आज भेटी दिल्या.

जिल्ह्यातील महसूल विभागाच्या कामकाजात गती आणण्यासाठी, स्थानिक प्रशासनाला मदत करण्यासाठी आणि शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी तालुका पालक अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तालुका पालक अधिकारी यांनी आज ग्रीस्टॅक नोंदणी, संजय गांधी निराधार आणि श्रावणबाळ योजजेतील लाभ देण्यात येणाऱ्या अडचणीमध्ये ई-केवायसी करणे, नैसर्गिक आपत्तीचा पंचनामे, पीएम आवास, घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास रेती वाटपाबाबत सविस्तर सुचना दिल्या. तसेच पीएम किसानचा लाभ देण्यासाठी ग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणी आवश्यक आहे. ३० जूनपर्यंत शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात यावी. नोंदणी केली नसलेल्या शेतकऱ्यांची यादी शासनास सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे या कामाला गती देण्याच्या सूचना तालुका पालक अधिकारी यांनी दिल्या.-

# हंगामपूर्व पिकांना मिलीपीड किडीचा धोका 'या' करा उपायायोजना

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

मे महिन्यात पाऊस पडला. शेतकरी आशेने शेतात उतरले... पण नशिबाने पुन्हा डाव साधला. जूनच्या सुरुवातीला पावसाने पाठ फिरवली आणि त्यातच मिलीपीड किडीने हंगामपूर्व पेरणी केलेल्या पिकांवर हल्ला चढवला आहे.

जमिनीखालून होणारा हा अति सूक्ष्म, पण अत्यंत घातक हल्ला अनेकांच्या शेतपिकांचे भवितव्य धोक्यात आणत आहे. आता शेतकऱ्यांपुढे फक्त एकच प्रश्न 'पुन्हा पेरावं का?

मे महिन्यात पाऊस पडला. शेतकरी आशेने शेतात उतरले... पण नशिबाने पुन्हा डाव साधला. जूनच्या सुरुवातीला पावसाने पाठ फिरवली आणि त्यातच मिलीपीड किडीने हंगामपूर्व पेरणी केलेल्या पिकांवर हल्ला चढवला आहे.

मे महिन्याच्या सुरुवातीस चांगला पाऊस झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी हंगामपूर्व पेरणी केली. मात्र, जून महिन्यात पावसाने दडी मारल्याने पेरलेली पिकं संकटात सापडली आहेत. त्यात भर म्हणून 'मिलीपीड' या जमिनीत राहणाऱ्या किडीचा जोरदार प्रादुर्भाव झाला आहे.

ही कीड बीजांकुर, उगवणारी रोपे आणि कोवळ्या पानांवर हल्ला करते, त्यामुळे रोपांची वाढ खुंटते, पिकं सुकतात, परिणामी दुबार पेरणी करण्याची वेळ येते.

**मिलीपीड किडीचा प्रादुर्भाव का आणि कसा होतो?**

* मिलीपीड (स्थानिक भाषेत वाणी किंवा पैसा म्हणून ओळखली जाणारी) कीड ही निशाचर असते.

* जमिनीत काही इंच खोल जाऊन मादी एकावेळी ३०० अंडी घालते.

* जमिनीतील आर्द्रता, उष्ण आणि दमट हवामान या किडीच्या वाढीसाठी अनुकूल ठरते.

* हे कीटक बियाणे, मुळे आणि कोवळ्या पानांवर तुटत खाण्याचे काम करतात.

* प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाल्यास उगवलेली रोपे पूर्ण नष्ट होतात, पेरलेले बीजही खराब होते.

**कोणत्या पिकांना धोका?**

सोयाबीन, मूग

उडीद, मका भुईमूग

अन्य खरीप पिकांची लहान रोपे

**काय आहे परिणाम?**

* पेरणीचा खर्च वाया

* पीक उगवले तरी वाढ खुंटते

* दुबार पेरणीसाठी वेळ, पैसा आणि बियाण्यांची गरज

* आर्थिक फटका आणि उत्पादनात घट

**'या' करा उपाययोजना**





* पेरणीपूर्व उपाय : कार्बोसल्फान (६% दाणेदार), क्लोरपायरीफॉस (२०% दाणेदार), किंवा फिप्रोनिल (०.३%)

प्रमाण : ५ किलो कीटकनाशक, ५० किलो शेणखतामध्ये मिसळून १ हेक्टरमध्ये पसरवावे

**उगवणीनंतर उपाय** : क्लोरपायरीफॉस २० ईसी - ३७.५ मिली प्रति १० लिटर पाणी

संध्याकाळी पिकांच्या मुळाभोवती ड्रेंचिंग पद्धतीने फवारणी करावी

**शारीरिक नियंत्रण उपाय** : शेतातील पालापाचोळा, कचरा साफ करावा

रात्री सक्रिय असलेल्या वाणी पकडण्यासाठी गवताचे ढीग करून त्यात जमा झालेल्या वाणींचे नाश करावा

गोळा केलेल्या वाणी मीठ किंवा साबणाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात

बीजप्रक्रिया करून पेरणी करावी

बीजप्रक्रिया केलेल्या बियाण्यांत प्रादुर्भाव अल्प प्रमाणात दिसतो.

**शेतकऱ्यांना सल्ला**

* किडीच्या प्रादुर्भावावर तात्काळ नियंत्रण मिळवा.

* कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधा.

* आवश्यकता भासल्यास योग्य वेळी दुसरी पेरणी करा.

*** कीटकनाशक वापरताना तज्ज्ञांचा सल्ला घ्या आणि सुरक्षा नियम पाळा.**

हवामान कोरडे असले, तरी जमिनीत आर्द्रता असेल तर किडीचा धोका अधिक असतो. त्यामुळे जमीन नांगरणीपूर्वी आणि पेरणीनंतर कीड नियंत्रणाचा विचार करणे अत्यावश्यक आहे.


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बॅंकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०







## मन:शांतीची गुरूकिल्ली - योगसाधना

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

बदलत्या काळात धकाधकीच्या जीवनात आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. शारीरिक समस्यांबरोबरच मानसिक व्याधींचे प्रमाणही वाढू लागले आहे. या शारीरिक आणि मानसिक व्याधींवर योगासने आणि प्राणायाम हा एक हुकमी उपचार ठरतो आहे.



भारताने जगाला अनेक गोष्टी दिल्या; पण अध्यात्म, योग, संगीत व आयुर्वेद या चिरंतर काळापर्यंत जगाला मार्गदर्शक ठरू शकतील अशा चार गोष्टी भारताने दिल्या. योग साधनेची परंपरा आपल्या देशात किती हजार वर्षांपासून आहे, हे ठामपणाने सांगता येणार नाही; पण योग ही आपली संस्कृती आहे. योगविज्ञानामध्ये जगण्याचा शास्त्रीय विचार केला आहे. ते जगण्याचे शास्त्र आहे. विशिष्ट पद्धतीने जगलो, तर त्याचा काय परिणाम होतो, याचा विचार योगामध्ये होतो. चिंतायुक्त आणि चिंतामुक्त, सकारात्मक जगण्यातील फरक योगशास्त्रात समजतो. म्हणूनच योग हा जगण्याचा हा एक शास्त्रीय मार्ग आहे. योग म्हणजे जागरूकता. जो मनुष्य योग करतो, त्याचा नियमित सराव करतो त्याच्यामध्ये जागरूकता येते.

योगासनांमुळे शरीराबरोबरच मानसिक आरोग्यही सुधारत असते, हे अनेकांना ठाऊक नसते; पण ती एक अनुभूती आहे. आरोग्याच्या तक्रारींचे प्रमाण वाढले की, दैनंदिन जीवनात अस्वस्थता निर्माण होते. आरोग्याच्या सततच्या तक्रारींना माणूस वैतागून जातो. त्यामुळेच आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य तंदुरुस्त ठेवण्यासाठी योगासने आणि प्राणायाम नियमित रूपात करणे आवश्यक आहे.योगविद्येनुसार आचरण करण्याची सुरुवात स्वतःपासून, स्वतःच्या मनापासून झाली पाहिजे. आज आसन व प्राणायाम या दोन पायर्यांसंबंधी काही प्रमाणावर माहिती लोकांना आहे. सामान्यतः योग शिक्षणाचे जे वर्ग चालतात ते या दोन पायर्यांचाच अभ्यास करून घेतात. योगासने ही सांधे, स्नायू व मज्जा या तिन्हीस कार्यक्षम करतात. शरीर सुदृढ होते. लवचिक होते. अनावश्यक चरबी झडून जाते. योगासनांमुळे अनेक अंतस्रावी ग्रंथी कार्यक्षम होतात. डायबेटिस, ब्लड प्रेशरसारखे दुर्धर आजार ही योगासनांच्या नियमित अभ्यासाने नियंत्रणात येतात. योगशास्त्र तर असे सांगते की, असलेल्या व्याधी तर योगासनांच्या अभ्यासाने दूर होतातच; पण नियमित योगासने करणारा साधक सहजपणे सर्व व्याधींपासून मुक्त राहतो.सूर्यनमस्कार हा सर्वांगसुंदर व्यायाम मानला जातो. प्रत्यक्षात नमस्काराच्या वेगवेगळ्या स्थिती ही निरनिराळी आसनेच आहेत. प्राणायाम हा श्वासाचा व्यायाम आहे. श्वसनमार्गाची शुद्धी, फुफ्फुसांची ताकद वाढणे, आवाज गोड होणे हे परिणाम लगेच दिसतात; पण मानवी शरीरातील अनेक आंतरिक शक्ती या प्राणायाम केल्याने हळूहळू जागृतही होतात. योगासने आणि प्राणायामामुळे मनावर आलेला ताण दूर होतो. पाश्चिमात्य संशोधकांनाही शरीर आणि मनावरील ताण दूर करण्यात योगासने आणि प्राणायाम अत्यंत उपयुक्त ठरतात असे आढळून आले आहे.आजच्या ताणतणावाच्या आणि प्रचंड स्पर्धेच्या काळात क्षुल्लक गोष्टींवरूनही चिडचिड होणे, राग आटोक्यात न राहणे, अशा तक्रारी अनेकांकडून ऐकू येतात. आयुष्यातील अडचणींचा परिणाम म्हणून अशा तक्रारी निर्माण होतात. योगासने आणि प्राणायामामुळे मनःशांती मिळते. अकारण होणारी चिडचिड थांबते. त्याचा परिणाम आपोआपच मानसिक आरोग्यावर होतो. योगासने आणि प्राणायामामुळे शरीराची प्रतिकारशक्ती वाढते. सदृढ आणि निरोगी आयुष्य जगण्याचा प्रभावी मंत्र म्हणून योगाकडे पाहिले पाहिजे.

# निराधार, श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरण करावे-जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती -** संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना डीबीटीद्वारे लाभ देण्यात येत आहे. मात्र आधार प्रमाणीकरण झालेले नसल्याने पेमेंट फेल होत असल्याने लाभ देण्यात अडचण येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ३२ हजार २७६ लाभार्थ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे करण्यात आले आहे. आजपर्यंत जिल्ह्यात ३२ हजार २७६ लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले नाही. ज्या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले नाही आणि ज्यांची डीबीटी पोर्टलवर नोंदणी झालेली नाही, अशा लाभार्थ्यांनी अद्ययावत आधार कार्ड आणि बॅंकेच्या पासबुकच्या प्रतीसह संजय गांधी योजना विभाग, तहसील कार्यालय येथे उपस्थित राहावे. जिल्ह्यात संजय गांधी योजना आणि श्रावणबाळ योजनेंतर्गत लाभार्थ्यांना थेट त्यांच्या बॅंक खात्यात अनुदानाचे वितरण करण्यात येते. शासनाने डिसेंबर २०२४ पासून डीबीटीद्वारे अनुदानाचे वितरण सुरू केले आहे. जून २०२५ चे अनुदान देखील वितरित करण्यात आले आहे. डीबीटी पोर्टलवर लाभार्थ्यांची नोंदणी आणि





अनुदान वितरणामध्ये जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे.जिल्ह्यात संजय गांधी योजनेंतर्गत एकूण ९१,९७२ लाभार्थी आहेत. त्यापैकी ८८,९५५ लाभार्थ्यांची डीबीटी पोर्टलवर नोंदणी झाली आहे. यापैकी ७९,२७५ लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले आहे. अद्यापही ९,६८० लाभार्थींचे आधार प्रमाणीकरण होणे बाकी आहे. जून २०२५मध्ये ७१,६६१ लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तर ५,३९५ लाभार्थ्यांचे पेमेंट अयशस्वी झाले आहे. असे यात एकूण ७७,०५६ लाभार्थी आहेत.श्रावणबाळ योजनेत जिल्ह्यात एकूण १,७४,२९० लाभार्थी आहेत. यापैकी १,६३,५४५ लाभार्थ्यांची डीबीटी पोर्टलवर नोंदणी झाली आहे. यात १,४०,९४९ लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले आहे. अद्याप २२,५९८ लाभार्थींचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे. जून २०२५ मध्ये १,२८,७५१ लाभार्थ्यांना अनुदान मिळाले आहे, तर ९,१०६ लाभार्थ्यांचे पेमेंट अयशस्वी झाले आहे. यात एकूण १,३७,८५७ लाभार्थी आहे.

डीबीटी पोर्टलवर पेमेंट अयशस्वी होण्यामध्ये मुख्य कारण आधार कार्ड बॅंक खाते क्रमांकाशी आणि एनसीपीआयशी लिंक नसणे किंवा आधार क्रमांक मॅप नसणे, आधार आयआयएनशी मॅप नसणे, लाभार्थ्यांचे आधार कार्ड बॅंक खाते क्रमांक बरोबर लिंक नसणे यामुळे पेमेंट अयशस्वी होत आहे. यामुळे लाभार्थ्यांनी त्यांच्या संबंधित बॅंकेच्या शाखेत जाऊन आपले आधार कार्ड एनपीसीआय आणि बॅंक खात्याशी लिंक करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १९ जून २०२५

शहर/ग्रामिण

# विदर्भातील शाळा २३ जूनला होणार सुरु

## प्रत्येक जिल्ह्यात आता प्रवेशोत्सव कक्ष अधिकारी, कर्मचाऱ्यांची होणार नेमणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती** – शैक्षणिक सत्रात राज्यातील शाळा १६ जूनपासून सुरू झाल्या आहेत तर, विदर्भातील शाळा सोमवारपासून (ता. २३ जून) सुरू होत आहेत. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यासाठी यावर्षी पहिल्यांदाच प्रत्येक जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सव कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. या कक्षामध्ये अधिकारी, कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांची गुणवत्ता न्व मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी राज्यात हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.विदर्भात शाळा २३ जूनपासून सुरू होत असल्याने २१ व २२ जून रोजी हा कक्ष सतत सुरू राहणार आहे. याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे. शाळा प्रवेशोत्सवाबाबत आवश्यक पूर्वतयारी करण्याचे निर्देश देण्यात आले असून मागितलेली माहिती तत्काळ द्यावी लागणार आहे. राज्यस्तरावरून यावर्षी पहिल्यांदाच शाळा प्रवेशोत्सव कक्ष स्थापन होत आहे. विशेष म्हणजे शाळा प्रवेशोत्सव याउपक्रमाची माहिती तात्काळ त्याचदिवशी वरिष्ठ स्तरावर द्यावी लागणार असल्याने गटशिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनला शाळा प्रणालीमध्ये शाळाभेटीचा अहवाल नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.२३ जून रोजीभेट देणारे लोक प्रतिनिधी किंवा अधिकाऱ्यांच्या भेटीच्या अहवालाची नोंद त्याच दिवशी तत्काळ शाळा प्रणालीमध्ये करावी लागणार आहे. ही सुविधा प्रवेशोत्सवाच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता बंद होणार असल्याने तत्पूर्वी सर्व माहिती शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे.

### 'योग दिवस' साजरा करण्याचे आदेश्

२१ जून 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' साजरा करण्यात येणारे आहे. शाळांना ग्रीष्मकालीन सुट्या असून सर्व शिक्षक व विद्यार्थी कार्यक्रमाकरिता शाळेत उपस्थित राहतील, याबाबत नियोजन मुख्याध्यापकांना करावे ला-गणार आहे. तसेच कोविड विषाणूचा प्रभाव लक्षात घेता शासनाकडून प्राप्त काळजी घ्यावायच्या सुचनांचे कटाक्षाने पालन करावे, असे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत.-



### शाळा पाच दिवस सकाळी्

विदर्भात २३ ते २८ जून या पाच दिवस शाळा सकाळच्या सत्रात म्हणजे सकाळी ७ ते ११.४५ या कालावधीत घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २९ जून रोजी रविवार असल्याने सुटी राहील. ३० जूनपासून शाळा नियमित वेळेवर सुरू होणार आहेत.

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे

# त्वरित पंचनामे करुन तात्काळ अहवाल सादर करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती** – जिल्ह्याचे सर्व साधारण क्षेत्र १२.२१ लाख असून लागवडी लायक क्षेत्र ७.८१ लाख हे. आहे. खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र ६.९१ लाख हे. व रब्बी पिकाचे सरासरी क्षेत्र १.४७ लाख हे. आहे. जिल्ह्यातील खरीपाची मुख्य पिके सोयाबिन,



कापूस, तूर असून रब्बीतील मुख्य पिके हरबरा व गहू आहेत. जिल्ह्यातील एकूण तालुक्यांची संख्या १४, एकूण गावांची संख्या २०१६ असून २०२१ च्या कृषि गणनेनुसार एकूण शेतकरी संख्या ४ लाख ५६ हजार ३६० आहे. त्या पैकी १ हे. पेक्षा कमी क्षेत्र असलेल्या शेतक-यांची संख्या ३६ टक्के, १ ते २ हे. क्षेत्र असलेल्या शेतक-यांची संख्या ४३ टक्के, २ हे. पेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या शेतक-यांची संख्या २१ टक्के आहे. जिल्ह्यातील सरासरी जमिन धारणा १.६४ हे. आहे. जिल्ह्याचे माहे जून महिन्याचे सरासरी पर्जन्यमान १४५.७ मि.मी असून दि. १६ जून २०२५ पर्यंत प्रत्यक्षात ४४.४ मि.मी. पाऊस झाला आहे. पावसाची टक्केवारी ३०.५ टक्के आहे.जिल्ह्यात माहे एप्रिल २०२५ व मे २०२५ या कालावधित नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेती, फळ पिकांच्या नुकसानीसाठी ४७.०५ कोटी रुपये शासनाकडे मागणी करण्यात आलेली आहे.

माहे जून महिण्यात दि. १ जून ते दि. १५ जून २०२५ या कालावधीत वादळी वाऱ्यामुळे जिल्ह्यातील ९४ गावातील ९३३.४३ हेक्टर क्षेत्रावर शेती पिके, फ़ळपिकाचे नुकसानीबाबत तालुका कृषि अधिकारी अंजनगाव, धारणी, चांदूरबाजार, चिखलदरा, मोर्शी व दर्यापूर यांनी प्राथमिक अहवाल सादर केलेला असून या बाधित क्षेत्राचे पंचनामे सुरु आहेत. बाधित क्षेत्राचे त्वरित पंचनामे करुन तात्काळ अहवाल सादर करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कृषी व महसूल विभागाला दिले आहे.

## बनावट दस्तऐवज तयार करून २५ लाखांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती–** मालकीच्या प्लॉटचे बनावट दस्ताऐवज तयार करून मूळ मालकाला २५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी महेश चेतनदास बजाज (वय ४८, रा. रामपुरी कॅम्प) यांच्या तक्रारीवरून विष्णू बंसीलाल व्यास (वय ५५) आणि एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. बजाज यांच्या मालकीच्या प्लॉटचे व्यास यांनी बनावट कागदपत्रे व नकाशा तयार करून सदर प्लॉटमधील १११५.४७चौ. फुट जागा स्वतःच्या मालकीची असल्याचे सांगितले.तसेच जागा खाली करण्याकरिता त्यांनी २५ लाख रुपयांची मागणी केली, असे बजाज यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

# मेळघाटातील सलोना येथे धरती आबा जनभागीदारी अभियानाचा शुभारंभ

## आदिवासी समुदायात जनजागृती, लाभ वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९धारणी–** केंद्र सरकारच्या 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' आणि 'प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियान' अंतर्गत आदिवासी व आदिम जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्यात विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. योजनांच्या माहितीसाठी महिती, शिक्षण आणि संवाद मोहिम राबविण्यात येत आहे. या अभियानाची आज मेळघाटातील सलोना येथे जनजागृती आणि लाभ वितरण शिबीर आयोजित करून सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्धाटन मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी केले. यावेळी धारणीचे प्रकल्प अधिकारी राहुल ठोंबरे, गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि मुख्य कार्यकारी



अधिकारी संजिता महापात्रा यांच्या मार्गदर्शनाखाली अभियान सुरू करण्यात आले आहे.

अमरावती जिल्ह्य़ातील ९ तालुक्यातील ३२१ गावात ३० जून पर्यंत 'धरती आबा जनभागीदारी अभियान' अंतर्गत विशेष कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या अभियानांद्वारे आदिवासी जाती जमातींना मोठ्या प्रमाणात लाभ मिळणार आहे.आज झालेल्या शिबिरात महसूल, कृषी, आदिवासी विकास, आरोग्य, महिला व बालकल्याण, पशुसंवर्धन आणि जिल्हा परिषदेच्या विभागांचे स्टॉल लावण्यात आले. तसेच आमदार केवलराम काळे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना केंद व राज्य शासनाच्या विविध योजनांचे लाभ वितरित करण्यात आले. शिबीराला मेळघाटातील आदिवासी नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.लाभार्थ्यांना जातीचे दाखले, रेशन कार्ड, जॉब कार्ड, आयुष्मान भारत कार्ड, किसान सन्मान निधी आणि मतदान ओळखपत्र यांचे लाभ देण्यात आले. तसेच, लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी, सिकलसेल तपासणी करण्यात आली. तसेच विविध विभागांच्या कल्याणकारी योजनांची माहिती देऊन नोंदणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.केंद व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचे लाभ पोहोचविण्यासाठी तसेच आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून याचा मेळघाटातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन आमदार केवलराम काळे, प्रकल्प अधिकारी राहुल ठोंबरे आणि गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकडे यांनी यावेळी केले.

# मंत्रालयात पार पडली उच्चस्तरीय बैठक

## बच्चू कडू यांच्या मागण्यांवर धोरणात्मक निर्णय घेणार : ना. भरत गोगावले



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९अमरावती**


माजी राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या अनुषंगाने रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बुधवारी (ता. १८) बैठक पार पडली. माजी राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. मनरेगा आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड, रोहयो विभागाचे सहसचिव अतुल कोदे, उपसचिव अरविंद पगार, पशुसंवर्धन विभागाचे उपसचिव श्री. मराळे, दिव्यांग कल्याण विभागाच्या उपसचिव सुनंदा घड्याळे तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पेरणीपासून ते कापणीपर्यंतच्या सर्व मजुरीची कामे मनरेगांत समाविष्ट करावीत, फळपिके व दुग्धव्यवसायालाही 'मनरेगा'शी जोडावे, 'मनरेगा'मधील मजुरी ३१२ रुपये वरून ५०० रुपये करण्यात यावी, दिव्यांग व विधवांना दरमहा ६ हजार रुपये मानधन द्यावे, असे माजी राज्यमंत्री बच्चू कडू म्हणाले.या सर्व मागण्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच संबंधित विभागाचे मंत्री यांच्याशी चर्चा करून, योग्य तो अभिप्राय घेऊन त्यावर धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, असा सकारात्मक प्रतिसाद रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी दिला. बैठकीच्या सुरुवातीस मंत्री गोगावले यांनी बच्चू कडू यांच्या प्रकृतीची विचारपूस केली आणि राज्य शासन या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीने पाहत असल्याची ग्वाही दिली.शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, विधवा महिला, बेरोजगार युवक, मेंढपाळ आणि मच्छीमार बांधव यांच्याशी संबंधित विविध मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मंत्रालयात ही उच्चस्तरीय संयुक्त बैठक झाली.

# मोर्शी आगाराचे नुतनीकरण अन् चोरट्यांचे चांगभले!

## आगारातील वीज जोडणी नाही; मोबाईल, दागिने, पाकिटांवर डल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९मोर्शी** – शहरातील बस स्थानकाच्या नुतनीकरणाचे काम पूर्णत्वास आलेले आहे. परंतु यामधील वीज जोडणी अजूनही करण्यात आलेली नाही, परिणामी स्थानकात अत्यावश्यक असलेले लाईट्स, पंखे त्याचबरोबर सीसीटीव्ही सुरू झालेले नाही. त्यामुळे चोरट्यांना चांगलेच फावले असून प्रवाशांच्या मोबाईल, दागिने, पाकिटांवर चोरटे डल्ला मारीत असल्याचे दिसून येत आहे.



मोर्शी आगारात दररोज शहरी तसेच ग्रामीण भागातून हजारो नागरिक जाणेयेणे करतात. त्यांना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी मोर्शी बस स्थानकाची जुनी इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्यातआलेली आहे. हे काम जवळपास पूर्ण झालेले आहेत परंतु बांधकाम करित असताना यातील विजेचे वायर काढण्यात आली होती परंतु नवीन इमारत झाल्यावर सुद्धा यामध्ये वायरिंग टाकलेली नाही, पर्यायाने या स्थानकात पंखे तसेच सीसीटीव्ही लावण्यात आलेले नाही. याचाच फायदा चोरटे घेत असून नुकतेच एका व्यक्तीच्या खिशातील मोबाईल चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली. त्याचबरोबर या आगारातूनअनेक महिला लग्नकार्य किंवा इतर प्रसंगी गावाला जातात. बसमध्ये गर्दी असल्याचा फायदा घेऊन काही चोरटे महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र किंवा रोख रकमेची चोरी करतात. सीसीटीव्ही सुरू असल्यास यावर काही प्रमाणात अंकुश लागू शकतो त्यामुळे या बस स्थानकात ताबडतोब वीज पुरवठा सुरू करणे गरजेचे आहे. आगारात सीसीटीव्ही उपलब्ध आहे परंतु वीज कनेक्शनची लाईन फिटिंग न झाल्यामुळे व कंत्राटदाराकडून नवीन इमारत हस्तांतरीत न केल्याने मोर्शी आगारात चोरीचे प्रमाण वाढले आहे. आगारात वीज पुरवठा ताबडतोब सुरू करून सीसीटीव्ही सुरू करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते निलेश रोडे यांनी केली आहे.

# अचलपूर नगरपरिषद निवडणुकीच्या मोर्चे बांधणीला सुरूवात

## प्रभाग रचनेवर चर्चेला वेग, इच्छुक उमेदवार जनसंपर्कात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९परतवाडा** – नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात पुन्हा एकदा राजकीय हालचालींना वेग आला आहे. राज्य शासनाने १० जून रोजी महत्त्वपूर्ण शासन निर्णय जारी करित नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडण्कासाठी प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयानंतर अचलपूर-परतवाडा या जुळ्या शहरात मोर्चे बांधणीला प्रारंभझाला असून इच्छुक उमेदवारांनी आपआपल्या प्रभागात जनसंपर्क सुरू केला असून, काहींनी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतल्याचे दिसून येत आहे.

शासन निर्णयानुसार महानगरपालिकांमध्ये चार सदस्यीय प्रभाग असतील नगर परिषदांमध्ये दोन सदस्यीय प्रभाग पद्धत राहील. त्यामुळे अचलपूर नगर परिषदेसाठीही मागील २०१७ च्या निवडणुकीप्रमाणेच प्रभाग रचना होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या



अचलपूर नगर परिषदेमध्ये एकूण ३९ नगरसेवक निवडून दिले जातात. मात्र, यावेळी प्रभागांची संख्या, सीमारेषा अथवा सदस्यसंख्या यामध्ये कोणतेही बदलहोतील का, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे इच्छुक उमेदवार राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकृत घोषणेची प्रतिक्षा करित आहेत.इच्छुक उमेदवारांनी मतदारांमध्ये सक्रियपणे जनसंपर्क वाढविला असल्याचे चित्र सध्या शहरात दिसून येत आहे. प्रभागनिहाय बैठका, लोकसंपर्क दौरे, विविध सामाजिक उपक्रम यांद्वारे आपली उपस्थिती ठसवण्याचा प्रयत्न होत आहे. निवडणूक आयोगाच्या घोषणेवर सर्वांची नजर लागली असून शहरातील नागरिक आणि सर्वच राजकीय पक्ष व कार्यकर्ते राज्य निवडणूक आयोगाकडून होणाऱ्या अधिकृत प्रभाग रचना व निवडणूक कार्यक्रमाच्या घोषणेची आतुरतेने वाट पाहत आहेत. एकदा का ही घोषणा झाली की, अचलपूरमध्ये निवडणुकीचा माहौल पूर्णपणे तापणार, अशी शक्यता आहे.

### निवडणूक आयोगाच्या घोषणेकडे लक्ष

सद्यस्थितीत अचलपूर शहरात निवडणुकीची जोरदार तयारी सुरू असून, प्रभाग रचना, मतदार यादी पुनर्रचना आणि उमेदवारांच्या हालचाली यामुळे राजकीय वातावरण हळूहळू तापू लागले आहे. आता निवडणूक आयोगाच्या घोषणेकडे सर्वांचे लक्ष लागले असून त्यानंतर मात्र हालचाली अधिक तीव्र होतील, यात कुठलीही शंका नाही.

# इराणमधून ११० विद्यार्थ्यांची पहिली तुकडी भारतात परतली

## विद्यार्थ्यांसह कुटुंबियांनी सरकारच्या माहिमेबद्दल व्यक्त केली कृतज्ञता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ नवी दिल्ली–** इस्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने तेथे राहणाऱ्या हजारो भारतीयांचे सुरक्षित परत आणण्यासाठी ऑपरेशन सिंधू सुरू केले आहे. इराणमधून आणण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची पहिली तुकडी गुरुवारी सकाळी भारतात पोहोचली. पहिल्या तुकडीत ११० हून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. दरम्यान, ४,००० हून अधिक भारतीय नागरिक इराणमध्ये राहत आहेत आणि त्यापैकी निम्मे विद्यार्थी आहेत. उत्तर इराणमधून ११० विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे आर्मेनियाला आणण्यात आले. दरम्यान, विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी सरकारच्या या कारवाईबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

इराणमध्ये अडकलेल्या ११० भारतीय नागरिकांना घेऊन जाणारे एक विशेष विमान दिल्ली विमानतळावर उतरले. या लोकांमध्ये यासिर गफ्फार नावाच्या एका विद्यार्थ्याने सांगितले की, आम्ही रात्रीच्या वेळी क्षेपणास्त्रे उडताना पाहिली आणि मोठ्या स्फोटांचे आवाज ऐकू आले. भीतीचे वातावरण होते, पण आता भारतात पोहोचल्यानंतर आम्हाला दिलासा मिळाला आहे. एका विद्यार्थ्याने सांगितले की, इराणमधील परिस्थिती दररोज



बिकट होत चालली आहे, विशेषतः तेहरानमधील परिस्थिती खूप गंभीर आहे. सर्व भारतीय विद्यार्थ्यांना तेथून बाहेर काढले जात आहे. भारतीय अधिकारी चांगले काम करत आहेत. आम्हाला सर्वांना सुरक्षित ठिकाणी पाठवले जात आहे.प्रथम विद्यापीठातून आर्मेनियाला नेण्यात आले, त्यानंतर तेथून त्याला कतारला पाठवण्यात आले. शेवटी तो भारतात पोहोचला. इस्रायलमधील सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर, इराण मधील भारतीय दूतावास मोठ्या संख्येने भारतीय नागरिकांना आर्मेनियाची राजधानी येरेवनमध्ये बाहेर काढण्यास मदत करत आहे. इराणमधील भारतीय नागरिकांना तेहरानमधील भारतीय दूतावासाच्या आपत्कालीन हेल्पलाइन आणि नवी दिल्लीतील परराष्ट्र मंत्रालयाने स्थापन केलेल्या २४७ नियंत्रण कक्षाच्या संपर्कात राहण्याचा सल्ला देण्यात आल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

# खाद्यतेलाचे दर किलोमागे १० रु.नी झाले कमी, गृहिणींना दिलासा

## आयात शुल्क घटल्याने वर्षात प्रथमच दरात झाली घसरण



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती –** मागच्या काही महिन्यांपासून खाद्य तेलाचे भाव गगनाला भिडले होते. यामुळे सर्वसामान्य लोकांचे किचन बजेट कोलमडले होते. अशातच पामतेल, सोयाबीन तेल आणि सूर्यफूल तेलाचे दर प्रत्येकी १० रुपयांनी कमी झाले आहेत. यामुळे गृहिणींना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेष म्हणजे वर्षात प्रथमच तेलाच्या दरात घसरण दिसून आली आहे. केंद्राने तेलावरील सीमा शुल्क कमी केले. या निर्णयामुळे खाद्य तेलांच्या दरात घसरण झाली आहे. आपल्याकडे खाद्यतेलाच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त गरज आयातीद्वारे पूर्ण करतो. सध्या बाजारात मंदी असल्याने तेलाचे दर स्थिर राहण्याची शक्यता आहे. एक ते दीड महिन्यांनंतर मात्र तेलाच्या दरात बदल होण्याची शक्यता असल्याचे व्यापारी रमेश तायडे यांनी सांगितले.

याशिवाय तूरडाळ आणि हरभरा डाळीच्या दरांत क्विंटलमागे दोनशे रुपयांनी घट झाली आहे. किरकोळ बाजारांत तूरडाळ १४०-१५० रुपये आणि हरभरा डाळ ९०-१०० रुपये प्रतिकिलो दराने विकली जात आहे. यंदा तूर, हरभरा डाळींसह सर्व कडधान्यांचे दर घसरते आहेत. आवक जास्त आणि मागणी कमी असल्याने हिरव्या वाटाण्याच्या दरात क्विंटलमागे पाचशे रुपयांनी घट झाली आहे. केंद्र सरकारने कच्चे पाम तेल, कच्चे सोयाबीन तेल आणि कच्चे सूर्यफूल तेलावरील सीमा शुल्क २० टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत कमी केले आहे. यामुळे खाद्य तेलाचे दर कमी झाले आहे, असे व्यापारी वर्गाकडून सांगण्यात येते. कडधान्यही स्थिर पांढऱ्या वाटाण्याच्या दरांत क्विंटलमागे चारशे ते पाचशे रुपयांनी वाढ झाली आहे. अन्य सर्व डाळी आणि कडधान्यांचे दर स्थिर आहेत. तसेच किरकोळ बाजारांत साखर ४४ ते ४५ रुपये प्रतिकिलो दराने विकली जात आहे. गूळ, गहू, ज्वारी, बाजरीसह अन्य वस्तूंचे दर स्थिर असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

# योग्य नियोजनाद्वारे केली पाणी टंचाईवर मात

### चिखलदरामध्ये सैनिकी शाळेचं पावसाळ्यात खास व्यवस्थापन

## १८ लाख लिटर पाण्याचा साठा



**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.१९चिखलदरा–**वर्षाला १७०० ते १८०० मिलिमीटर इतका पाऊस चिखलदरा येथे होतो. इतक्या मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळत असला तरी सातपुडा पर्वत रांगेत टोकावर वसलेल्या चिखलदरा येथील पावसाचं पाणी पहाडावरून खाली वाहून जातं. त्यामुळं चिखलदरा शहरात पाण्याची मोठी टंचाई भासते. दरम्यान, या टंचाईवर मात करण्यासाठी पावसाळ्यात शाळेची इमारत, हॉटेलची इमारत, खानावळ यासह शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या घरांवर कोसळणारं पावसाचं एकूण १८ लाख लिटर पाणी साठवण्याची व्यवस्था दीपशिखा निवासी गुरुकुल सैनिकी शाळा प्रशासनानं केलीय. महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक सूर्यकांत जोग यांनी १९९१ मध्ये सुरू केलेल्या या सैनिकी शाळेच्या परिसरात असणाऱ्या प्रत्येक इमारतीवर असणारं पावसाचं पाणी वाया जाणार नाही, याची काळजी घेतली. त्यांच्या या दूरदृष्टीमुळं या शाळेत आज १८ लाख लिटर पाणी साठा पावसाळ्यात होतो आणि वर्षभर हे पाणी पुरतं. राज्याचे पोलीस महासंचालक म्हणून १९८७ मध्ये सेवानिवृत्त झालेले सूर्यकांत जोग यांनी दीपशिखा शिक्षण संस्था १९८८ मध्ये स्थापन केली. या संस्थेअंतर्गत चिखलदरा येथे १९९१ मध्ये दीपशिखा गुरुकुल सैनिकी शाळा सुरू केली. त्यावेळी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी या सैनिकी शाळेला भेट दिली आणि राज्यात प्रत्येक जिल्ह्यात अशी निवासी सैनिकी शाळा सुरू करण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता, अशी माहिती महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण विभागाचे माजी संचालक आणि दीपशिखा निवासी सैनिकी शाळेचे संचालक डॉ. के. एम. कुळकर्णी यांनी सांगितलं. चिखलदरा येथे सर्वात मोठी समस्या ही पाण्याची आहे. शाळेच्या सुरुवातीच्या काळात पाण्यामुळं बऱ्याच अडचणी उद्भवल्या. त्यावेळी सूर्यकांत जोग यांनी चिखलदरा परिसरात जी काही पाण्याची ठिकाणं आहेत. त्यांचा शोध घेतला. त्यानंतर चिखलदरा पंचायत समितीसह ट्रेझरी कार्यालय परिसरात इंग्रजकालीन पाणीसाठ्याच्या व्यवस्थेची दुरुस्ती सूर्यकांत जोग यांनी करून घेतली. त्यांच्या या प्रयत्नांना चिखलदरा शहराला थोडाफार पाणी पुरवठा होण्यास मदत झाली. शाळेच्या परिसरात देखील जलप्राधिकरणाचं पाणी यायला लागलं. मात्र ते पुरेसं नव्हतं, असं डॉ. के. एम. कुळकर्णी यांनी सांगितलं.

# शासन दरबारी श्रींच्या पालखी सोहळ्याची दखल

## शेगावसह श्री संत वासुदेव महाराज पालखीचाही सोहळ्यामध्ये केला समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अकोला–** श्रीक्षेत्र पंढरपूर वारीसाठी संपूर्ण महाराष्ट्र तथा इतर राज्यांमधून येणाऱ्या विविध पालख्यांसाठी महाराष्ट्र शासनाने सेवा सुविधा पुरवण्याबाबत आराखडा नियोजित केला आहे. विदर्भामध्ये तीन पालख्यांबाबत शासनाने निर्देश देऊन सेवेची आखणी केली आहे. यामध्ये विदर्भकन्या श्री रुक्मिणी देवी पालखी सोहळा श्रीक्षेत्र कौंडण्यपूर, श्री संत गजानन महाराज पालखी सोहळा, शेगाव आणि श्री संत वासुदेव महाराज पालखी सोहळा, श्री क्षेत्र श्रद्धासागर, आकोट या तीन पालख्यांचा यामध्ये समावेश आहे. जिल्हा प्रशासन यामध्ये जातीने लक्ष घालून या तीनही पालखी सोहळ्यांना विविध सेवा देत आहेत. कोरोना काळातसुद्धा सलग दोन वर्ष सद्गुरु श्री संत वासुदेव महाराज यांच्या पादुकांना शासनाच्या विशेष सेवा सुविधेमध्ये श्रीक्षेत्र पंढरपूर वारीकरिता श्री रुक्मिणी माता पालखी सोहळ्यामध्ये बहुमान देण्यात आला होता. तोच बहुमान कायम ठेवत श्री संत वासुदेव महाराज पालखी



सोहळ्यामध्ये शासनातर्फे शासकीय, वैद्यकीय व पोलिस प्रशासनाकडून विविध सेवा दिल्या जात आहेत. वारकऱ्यांच्या सेवेत म्बुलन्स पालखी सोहळ्यामध्ये आहे. दिंडी सोहळ्याचे व्यवस्थापनावर चर्चा शासन निर्देशानुसार नायब तहसीलदार सुनील देशमुख, मालेगाव यांनी पालखी सोहळ्यामध्ये येऊन दिंडी व्यवस्थापनाबाबत चर्चा केली. तसेच त्यांच्यासोबत असणाऱ्या वैद्यकीय सेवेच्या टीमने सर्व वारकऱ्यांची तपासणी करून औषधांचे वितरण केले. नायब तहसीलदार कैलास देवळे, वाशीम यांनी सकाळी भेट व चर्चा केली. तसेच दिंडीतील वारकऱ्यांशीही संवाद साधत त्यांच्या समस्या आणि मदती साठी आवश्यक असणाऱ्या बाबी संदर्भात चर्चा करून तत्काळी मदतीसाठी उपाय योजना केल्या.

# बडनेरा रेल्वेस्टेशनवर मालगाडी रुळावरून घसरली ! अप लुपलाईनवर घडला अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९बडनेरा** :बुधवार संध्याकाळी ६.२० वाजताच्या दरम्यान रेल्वेस्टेशन बडनेरा येथील यार्ड मध्ये कि. मी नं. ६६१/१७ वर खाली रैंक असलेली मालगाडीचा डब्बा रुळाच्या खाली उतरला. सदर घटना यार्डमध्ये साईड अप ग्रुपलाईनवर घडली. अप-डाऊन मेन लाईनवर याचा काही परिणाम झाला नसून दोन्ही रेल्वेलाईन सुरू आहे.सदर ठिकाणी रेल्वे विभाग स्टाफ पोहचला असून काम सुरू आहे. यापूर्वी या ठिकाणी बऱ्याच रेल्वेलाईन वरून मालगाडी रुळावरून घसरल्याच्या घटना झाल्या आहेत. मोठ्या प्रमाणात संध्याकाळच्या वेळेस मेल, एक्स्प्रेस मुंबईकडे जात असतात आणि आता रेल्वे विभागाकडून मालगाडीचा डब्बा रुळावरून काढण्यात आला आहे.



# प्रत्येक जिल्ह्यात दहा शाळांमध्ये तंबाखूमुक्त, ड्रग्जमुक्त अभियान

## नशाबंदी मंडळाच्या राज्यस्तरीय बैठकीत वार्षिक नियोजन


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती–** प्रत्येक जिल्ह्यात किमान दहा शाळा तंबाखूमुक्त करण्याचा व प्रत्येक जिल्ह्यात ड्रग्जमुक्त जिल्हा अभियान राबवण्याचा संकल्प नशाबंदी मंडळाच्या राज्यस्तरीय संवाद समन्वय आणि वार्षिक नियोजन बैठकीत करण्यात आला.

नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत व्यसनमुक्तीवर कार्य करणारी संस्था आहे. या संस्थेने ६७ वर्ष पूर्ण करून महाराष्ट्रातील ३६ जिल्हा संघटकांचे संवाद, समन्वय आणि वार्षिक नियोजन बैठकीचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

या ठिकाणी संघटकाना २०२५-२६ ची मान्यता तसेच वर्षभरात संघटकांचे कार्याचे नियोजन करण्यात आले. संघटकांना साहित्यात पोस्टर, प्रत्रक, महामानवाने विचारांचे पुस्तक, व्यसनमुक्तीवरील सापशिडी देण्यात आली. मतपरिवर्तनातून व्यसनमुक्त समाज निर्माण करणे हे मंडळाचे ध्येय आहे. माणूस ज्यावेळी एक किंवा अनेक व्यसनांच्या आहारी जातो तेव्हा व्यसनांमुळे माणसाला शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम व तोंड द्यावे लागते. कुठल्याही प्रकारचे व्यसन आयुष्यात लागू न देणे व आजीवन निर्व्यसनी राहण्यासाठी नशाबंदी मंडळ राज्यभर अभियान राबवणार आहे.

या राज्यस्तरीय संघटक बैठकीचे उद्घाटन प्रयासचे अध्यक्ष डॉ. अविनाश सावजी, नशाबंदी मंडळाचे सरचिटणीस वर्षा विद्या विलास, मुख्य संघटक चिटणीस अमोल




मडामे, चिटणीस चंद्रकांत चौधरी, सदस्य बॉस्को डिसुझा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ३६ जिल्ह्यातील संघटक, ७ विभाग प्रमुख, नशाबंदी मंडळाचे कार्यालय कर्मचारी उपस्थित होते, अशी माहिती नशाबंदी मंडळाचे अकोला जिल्हा संघटक बबनराव कानकिरड यांनी दिली आहे.काही दिवसांपूर्वी या अभियानाची अकोला मंडळाकडून सुरूवात नवीन बस स्थानक परिसरात आयोजित तंबाखूविरोधी जनजागरण अभियानाने करण्यात आली. यावेळी बसस्थानक परिसरात तंबाखूविरोधी पोस्टर लावण्यात आले. बैठकीला तसेच या उपक्रमाला सर्वोदय मंडळाचे जिल्हा सचिव डॉ. मिलिंद निवाणे, रामकृष्ण खादी उपक्रमाचे प्रवर्तक महेश आढे, रोहित तारकस, अनिल मावळे, अशोक रामटेके, अनिल वाघमारे, हिंमतराव गावंडे, एसटी आम्हाला संघटनेचे मोहम्मद खान अल्ताफ खान, मोहम्मद युनूस मोहम्मद युसुफ, शेख युनुस शेख करीम, आमिर खान रहीम खान यांच्यासह ऑटो रिक्षा चालक, एसटी हमाल, नशाबंदी मंडळाचे कार्यकर्ते, सर्वोदयी कार्यकर्ते, प्रवासी मित्र यांनी तंबाखू मुक्तीची शपथ घेतली.

# अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांचं वयाच्या ९३ व्या वर्षी निधन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९सोलापूर**



महाराष्ट्राला साहित्यामधून जंगल, पक्षी आणि प्राणी वाचायला शिकवलं, अशा लोकप्रिय लेखक आणि वन्यजीव अभ्यासक अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांनी वयाच्या ९३ वर्षी अखरेचा श्वास घेतला.पद्मश्री पुरस्कार प्राप्त मारुती चितमपल्ली मागील दोन महिन्यांपासून वृद्धपकाळानं अंथरुणावरच होते.

३० एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते मारुती चितमपल्ली यांना पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. या पुरस्कार सोहळ्यावेळी दिल्लीतून परतल्यापासूनच त्यांची प्रकृती चिंताजनक होती. ते आजारी असल्यानं अंथरुणातचं होते. बुधवारी सायंकाळच्या सुमारास सोलापुरातील राहत्या घरी त्यांचं निधन झालं आहे.

प्रतिभावंत लेखक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षीशास्त्रज्ञ आणि वन्यजीव अभ्यासक म्हणून त्यांनी महत्त्वाचं योगदान दिलं आहे.

अवघे जीवन वनविद्येचा अभ्यास आणि लेखनासाठी समर्पित करणारे व्यासंगी संशोधक आणि वनाधिकारी म्हणून मारुती चितमपल्ली यांची ओळख मराठी जगताला आहे.

**मुख्यमंत्र्यांनी अर्पण केली श्रद्धांजली**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मारुती चितमपल्ली यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे, निसर्गाला शब्दरूपांनी साजिवंत करणारे आणि मराठी साहित्यात निसर्गसंपदे विषयीच्या अक्षरधनाची भर घालून, आपली साहित्य संपदा समृद्ध करणारे अरण्यऋषी म्हणून पद्मश्री मारूती चितमपल्ली अजरामर राहणार आहेत. निसर्ग आणि साहित्य क्षेत्रात व्रतस्थ राहून काम करणारे चितमपल्ली यांचं निधन महाराष्ट्रासाठी एक मोठी हानी आहे. त्यांच्या निधनानं एक दिपस्तंभ निमाला आहे, अशी श्रद्धांजली मुख्यमंत्र्यांनी अर्पण केली आहे.

# शहर स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी कचरा व्यवस्थापन, जनजागृती

## महानगरपालिकेद्वारे कामाला सुरुवात, जनतेने स्वच्छतेबाबत संकल्प करावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

शहरात स्वच्छतेसाठी महानगरपालिका विविध उपक्रम राबवत आहे. यात नियमित साफसफाई, कचरा व्यवस्थापनासह जनजागृतीचा समावेश आहे.

शहरात स्वच्छतेसाठी महानगरपालिकेच्या वतीने केली जाणारी कार्यवाही जसे की, शहरातून कचरा नियमितपणे उचलणे. कचरा वर्गीकरण आणि पुनर्वापर प्रकल्प. कचरा प्रक्रिया केंद्र (वेस्ट प्रोसेसिंग प्लॅन्ट) उभारणे, ठरलेल्या वेळेत आणि मुख्य ठिकाणी स्वच्छता मोहिम राबवणे, नागरिकांचा सहभाग घेणे, स्वच्छता विषयक जनजागृती कार्यक्रम, कचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरणे, कचरा जाळणे किंवा खत बनवणे, कचरा साठवणुकीसाठी योग्य व्यवस्था करणे, सार्वजनिक ठिकाणी, उद्यानांमध्ये स्वच्छता ठेवणे, शौचालये स्वच्छ ठेवणे, पावसाळ्यात विशेष स्वच्छता मोहिम राबवणे, या सार्वत्रिक प्रयत्नांमुळे अमरावती शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न असून प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाल्याचे महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सांगितले.

स्वच्छतेबाबत कुणीही तडजोड करता कामा नये. शिवाय, सार्वजनिक स्वच्छता केवळ महापालिकेची जबाबदारी असल्याची मानसिकताही बदलण्याची गरज आहे. आपले शहर स्वच्छ असावे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. याबाबत सकारात्मक मानसिकता नागरिकांमध्ये तयार होण्याची गरज आहे. असे प्रतिपादन महानगरपालिका अतिरिक्त आयुक्तांनी केले. स्वच्छता अभियानात नागरिकांनी सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे. स्वच्छता राखण्यासाठी नियमांचे पालन करणे. आपल्या परिसरातील स्वच्छता जपण्याची जबाबदारी नागरिकांनी घेणे. या पार्श्वभूमीवर शहरातील प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेबाबत संकल्प करावा, असे आवाहनही महानगरपालिका अतिरिक्त आयुक्तांनी केले आहे.

प्रभाग क्रमांक २२ नवी वस्ती अंतर्गत येणाऱ्या मिलचाल येथे धुवारणी करण्यात आली. पुर्व झोन क्र.३ अंतर्गत गगलानी नगर प्लॉट नं.६४ तुळजा भवानी मंदिर परिसरातील कचऱ्याचे ढिग उचलण्याची कार्यवाही करण्यात आली.

यावेळी महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त, वैद्यकीय स्वच्छता अधिकारी डॉ.अजय जाधवब, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, एसबीएम समन्वयक श्वेता बोके तसेच स्वास्थ निरीक्षक, बिटप्यून व मनपा तसेच कंत्राटदार यांचे सफाई कामगार उपस्थित होते.

# दर्यापुरात कापूस वाणाच्या अवैध साठ्यावर मारला छापा

## कृषी अधिकाऱ्यांनी केले शेतकऱ्यांना बियाणे वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ दर्यापूर**

खरीप हंगाम सुरू झाला असून काही भागात शेतकरी पेरणीही करीत असल्याचे चित्र आहे. दरम्यान तालुकास्तरीय भरारी पथकाची तपासणी चालू असताना बुधवारी रात्री दर्यापूरातील विदर्भ कृषी सेवा केंद्र येथे अजित १५५ कापूस वाणाचा अवैध साठा आढळून आला.

कृषी अधिकाऱ्यांनी दुकानदारास बियाणे साठ्याचा स्रोत विचारल्यास दुकानदाराकडून कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे सदर दुकानदार हा जास्त मागणी असणाऱ्या अजित १५५ कापूस वाणाचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून जास्त दराने बियाणे विक्री करीत असल्याचा प्रकार उघडकीस आला. दरम्यान सदर साठा तालुका कृषी अधिकारी आरती साबळे, पंचायत समिती कृषी अधिकारी सुरेश रामागडे, उपअधिकारी संतोष राणे, कृषी अधिकारी प्रशांत हाडोळे, आनंद गावंडे यांच्या उपस्थितीत प्रति शेतकरी पाच बॅग अशाप्रकारे वितरित करण्यात आला. तालुकास्तरीय भरारी पथकाच्या कारवाईने कृषी केंद्र संचालकांचे धाबे दणाणले आहेत. तर शेतकऱ्यांना जागेवरच कृषी अधिकाऱ्यांनी बियाणे दिल्याने समाधान व्यक्त केले आहे.

# भरदिवसा सोन्याची साखळी व अंगठी पळविली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मोर्शी**

शहराच्या मुख्य बाजारपेठेत रामदास कापसे यांना हात दाखवून त्यांना थांबविण्यात आले व काय काकाजी, तुम्हाला माहित नाही काय, दिवसाढवळ्या चोरीचे प्रमाण वाढत आहे. आम्ही काईम ब्रांचवाले पोलिस असल्याचे सांगून त्यांना लुबाडण्याचा प्रयत्न केला: परंतु त्यांनी सावधगिरी दाखवून आयकार्ड मागितले व मी पोलिसस्टेशनला फोन लावतो म्हणून सांगितले. तेवढ्यात त्यांनी त्या जाग्यावरून पळ काढला. याबाबत त्यांनी पोलिसस्टेशनमध्ये घटनेची माहिती दिली. ते होत नाही तरहा दुसरा प्रकार महादेव कॉलनी येथे घडला.

मोटरसायकलवरून आलेल्या इसमाने एसटी. डेपोच्या बाजूला महादेव कॉलनीत सोन्याची साखळी व अंगठी अंदाजे तीन लाखांचे सोने पळविले. सकाळी १०.३० ते ११ च्या दरम्यान शामसुंदर राधाकिसन बंग (७०) हे तहसीलमधून घराकडे परत येत असताना चोरी करणारे सीसीटीव्हीमध्ये कैदअशोकराव कनेर यांच्या घरासमोरच मोटरसायकलने आलेल्या इसमाने त्यांना थांबविले व आम्ही क्राईम ब्रच पोदलसवाले आहे, अशी बतावणी केली तुम्ही असे सोने गळ्यात घालून फिरून राहिले. ते खिशात ठेवा. चोऱ्या होऊन राहिल्या, सांगून अंगावरचे गोफ व अंगठी काढायला लावली व कागदात बांधली व त्यांना परत दिली. लगेच ते घरात गेल्यावर कागद उघडून पाहिलातरत्यामध्ये गोटे निघाले तेव्हा त्यांची तारांबळ उडाली. २० ग्रॅमचा सोन्याची चेन, ५ ग्रॅमचा सोन्याचे लॉकेट व ५ ग्रॅमची अंगठी चोरट्यांनी भूलथाप देऊन कागदामध्ये बांधली व त्यांच्याजवळ दुसराच बांधलेला कागद दिला व पळून गेले त्यांच्या मुलाला घेऊन पोलिसस्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्याकरिता गेले. श्यामसुंदर राधाकिसन बंग हे महादेव कॉलनीमध्ये अशोकराव कनेर यांच्या घरी भाड्याने राहतात. हे दोन्ही चोर मोटरसायकलने आले. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात गाडी घेऊन जाताना दिसत आहे. पोलिसांना चोर कधी सापडतात, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रीय कायाकल्प योजनेंतर्गत मोर्शी उपजिल्हा रूग्णालय द्वितीय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मोर्शी**




राष्ट्रीय कायाकल्प योजनेंतर्गत सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये स्थानिक उपजिल्हा रुग्णालय मोर्शीला द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. लवकरच शासनस्तरावर समारंभ घेण्यात येऊन उपजिल्हा रुग्णालय मोर्शीला १० लाख रुपयांचा धनादेश प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे.

या कायाकल्प योजनेत २५२ रुग्णालयांचा सहभाग होता. भारत सरकार आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत हा पुरस्कार १५ मे २०१५ रोजी जिल्हा आणि राज्य पातळीवर विविध रुग्णालय आणि सामुदायिक आरोग्य केंद्रांनी अधिक स्वच्छ आणि शुद्ध वातावरणासाठी दाखवलेल्या सकारात्मक प्रयत्नांचे कौतुक करण्यासोबतच दखल घेण्यासाठीहा पुरस्कार सुरू केला आहे. त्यामध्ये संसर्ग नियंत्रण कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छता पद्धतींना प्रोत्साहन देणे, सार्वजनिक आरोग्य सेवा देशभरातील आरोग्यसेवा केंद्राद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा वाढवण्यासाठी व्यवहार्य धोरणे तयार करणे आणि त्यांची आदानप्रदान करणे, हे उद्दिष्ट होती. यासाठी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार तसेच रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद पोद्दार हे जेव्हापासून रुजू झाले. तेव्हापासून रक्तदान चळवळ, छोटे मोठे ऑपरेशन दर पंधरा दिवसांनी कॅम्प घेऊन राबविल्या जातात. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरावर अभिनंदन केल्या जात आहे.

# अतिसार रोखण्यासाठी आरोग्य विभागाची विशेष मोहीम

## जिल्हास्तरीय जनजागृती मोहिमेचे नांदगाव पेठ येथे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नांदगाव पेठ**




मान्सूनपूर्व परिस्थितीत अतिसारासारख्या आजारांचा धोका वाढत असतो. याला आळा घालण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या स्टॉप डायरिया कॅम्पेन या जिल्हास्तरीय जनजागृती मोहिमेचे उद्घाटन नांदगाव पेठ येथील आयुष्यमान आरोग्य मंदिरात उत्साहात पार पडले.मोहीमेअंतर्गत घरोघरी अतिसार या रोगाबाबत जनजागृती करण्यात येणार असून अतिसार प्रतिबंधासाठी औषधे व माहितीपत्रक वाटप करण्याचे देखील नियोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहा.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पारीसे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून लकडे मॅडम, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख शिंदे मॅडम,नांदगाव पेठ ग्रामपंचायतच्या ग्रामपंचायत अधिकारी हर्षदा बोंडे, प्राथमिक आरोग्य केंद्र, माहुली जहागीर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहा राऊत आणि डॉ. मंगला मोहोड आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.यावेळी सहायक आरोग्य अधिकारी संजय पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, अतिसार हा बालकांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच बाधू शकणारा संसर्गजन्य आजार आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी स्वच्छता, सुरक्षित पाणी आणि संतुलित आहार आवश्यक आहेत. त्यांनी मोहिमेत सर्व घटकांनी सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन केले. या मोहिमेचे आयोजन समुदाय आरोग्य अधिकारी सौरभ पाटील, आरोग्य सेवक मोहम्मद मुझफ्फर व अभिलाष टेकाडे, तसेच आरोग्य सेविका आम्रपाली चव्हाण, ललिता मेश्राम, ढोले मॅडम यांच्यासह सर्व आशा वर्कर्स आणि अंगणवाडी सेविका यांच्या सहकार्याने अतिशय नियोजनबद्ध रितीने करण्यात आले.या मोहिमेला गावकऱ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला.

# महसूल विभागाची अवैध रेती वाहतुकीवर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९धा. रेल्वे**



धामणगाव रेल्वे तालुक्यात अवैध गौणखनिजाची चोरी होत असल्याने येथील तहसीलदार अभय घोरपडे यांनी महसूल विभागाचे भरारी पथक नेमले आहेत. दरम्यान बुधवार १८ जून रोजी तळेगाव दशासर येथे अवैध रेतीचाएक ट्रॅक्टर महसूल विभागाने मुद्देमालासह जप्त केला.

महसूल विभागाकडून गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीला आळा बसावा, यासाठी भरारी पथक नियुक्त केले आहेत. बुधवारी १८ जून रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास मौजा तळेगाव दशासर येथील आठवडी बाजारजवळ अवैध गौणखनिज बाहतूक केली जात असल्याची माहिती पथकाला मिळाली.

दरम्यान येथील ट्रॅक्टर क्र. एम. एच. २२पी २०१५ मुद्देमालासह आढळून आला. सदर ट्रॅक्टर थांबवला असता ट्रॅक्टर चालक व मालक सतीश जवंजाळ, रा. तळेगाव दशासर याला अवैध रेती वाहतुकीचा परवाना विचारला असता त्याच्याकडे कुठलाही परवाना आढळून आला नाही.तळेगाव दशासर येथील रेतीचा ट्रॅक्टर मुद्देमालासह जप्त चौकशीदरम्यान सदर ट्रॅक्टरमध्ये अंदाजे १ ब्रास रेतो बेंबळा नदी पात्रातून अवैधरीत्या उत्खनन करून विनापरवाना वाहतूक करीत असल्याचे निष्पन्न झाले. सदर रेती ही तळेगाव दशासर येथे घेऊन जात असल्याचे ट्रॅक्टर चालक यांनी सांगितले. ट्रॅक्टर व रेतीचा पंचासमक्ष पंचनामा करण्यात आल असून दंडात्मक कारवाईकरिता ट्रॅक्टर जप्त करण्यात आलेला आहे. सदर गौणखनीज पथकाच्या कारवाई तालुका पालक अधिकारी तथा भूसंपादन उपजिल्हाधिकारी प्रसनजीत चव्हाण व तहसीलदार अभय घोरपडे यांच्या मार्गदर्शनात ग्राम महसूल अधिकारी सागर भांडवले, गौरव श्रीराव व ताटेश्वर पाटील याच्या पथकाने केली आहे.

# शहरातील प्रत्येक प्रभागात युवक कॉंग्रेस राबवित आहे स्वच्छता अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

ऐन पावसाळ्याच्या तोंडावर शहरातील अनेक भागात स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असून रोगराईचा धोका निर्माण झाला आहे. लोकप्रतिनिधी व मनपा प्रशासनाच्या उदासीनतेमुळे लाखो शहरवासीयांच्या आरोग्याच्या प्रश्न निर्माण झाला आहे. सामान्य जनतेला भेडसावत असलेल्या या महत्वाच्या समस्यांकडे लोकप्रतिनिधी व मनपा प्रशासनाचे लक्ष वेधण्याकरिता अमरावती विधानसभा युवक कॉंग्रेसच्या वतीने 'शहर स्वच्छता अभियान' ही अभिनव मोहिम हाती घेण्यात आली आहे. आपलं शहर, आपली जबाबदारी या ब्रीदवाक्यानुसार या मोहिमेअंतर्गत शहरातील प्रत्येक प्रभागात स्वच्छता अभियान राबविण्यात येणार असून, स्थानिक नागरिकांचा सहभाग वाढवून परिसर स्वच्छ आणि आरोग्यदायी ठेवण्याचा मुख्य उद्देश आहे.

आज १९ जून, गुरुवार रोजी सकाळी ९.०० वाजता या अभियानाची सुरुवात करण्यात आली. स्वच्छतेचा मूलमंत्र देणाऱ्या संत गाडगेबाबा यांच्या गाडगेनगर येथील प्रतिमेला अभिवादन करून या माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, शहर कॉंग्रेस अध्यक्ष बबलूभाऊ शेखावत, माजी महापौर विलासभाऊ इंगोले, माजी महापौर मिलिंदभाऊ चिमोटे, प्रदेश कॉंग्रेस उपाध्यक्ष भैय्याजी पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या मोहीमेला सुरुवात करण्यात आली यानंतर आठवड्यातील प्रत्येक रविवारी शहरातील विविध भागात स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.

# रेशनचे धान्य विकले तर रद्द होणार कार्ड शहर पुरवठा विभाग करेल कारवाई

## पुरवठा विभाग गंभीर : साठेबाजांवर करडी नजर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि,१९ अमरावती**

रेशनचे धान्य लोकांकडून विकत घेऊन ते खुल्या बाजारात विकणारे धान्य तस्कर मागील काही दिवसांपासून अधिक सक्रीय झाले आहे. शहर पुरवठा विभागाने सुद्धा त्यांच्यावर कारवाईसाठी कंबर कसली असून धाडी टाकणे सुरू केले आहे. पुरवठा विभागाने नागरिकांनाही खुल्या बाजारात धान्य न विकण्याचे आवाहन केले आहे. कुणी जाणीवपूर्वक रेशनचे धान्य बाहेर विकत असल्याचे आढळून आल्यास त्याचे कार्ड रद्द करण्याबाबत पुरवठा विभाग गांभीर्याने विचार करीत आहे.

पावसाळ्यात रेशनचे धान्य घेताना गरीब व गरजू लोकांना अधिक त्रास होऊ नये. म्हणून राज्य सरकारने तीन महिन्याचे रेशन एकाच वेळी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार रेशन वाटपास सुरूवात झाली आहे. तीन महिन्यांचे रेशन एकाच वेळी मिळत असल्याने साठेबाजी करणारे धान्य तस्करही सक्रीय झाले आहेत. काहींनी तर रेशन दुकानांवरच ठाण मांडले आहे. अधिकचे धान्य असल्याने गरीबही थोड्या पैशासाठी ते धान्य देण्यास तयार होतात. याचाच फायदा घेऊन ते ग्राहकांकडून धान्य विकत घेतात आणि खुल्या बाजारात विकताहेत. वस्त्यावस्त्यांमध्ये फिरून रेशनचे धान्य विकत घेतले जात आहे.

**रेशनचे धान्य पोस्टीक, १२ प्रकारचे व्हिटॅमिन युक्त**

रेशन दुकानातील तांदूळ हे पोस्टीक आहे. त्यात आयरन, फोलीक सीड, व्हीटॅमिन बी-१२,व्हिटॅमिन -ए, व्हीटॅमिन बी-१, बी-३ यासाह एकूण १२ प्रकारचे व्हिटॅमिन आहेत. त्यामुळे हे पास्टीक धान्य स्वत: वापरा ते विकू नका, असे आवाहन शहर पुरवठा विभागाने केले आहे.

# डसॉल्ट-रिलायन्सचा ऐतिहासिक करार नागपूरमध्ये होणार जागतिक दर्जाचं विमान उत्पादन

## भारताची उड्डाण क्षमता वाढली : नागपूर बनणार जेट निर्मिती केंद्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

पॅरिसमध्ये पार पडत असलेल्या एअर शो दरम्यान, डसॉल्ट एव्हिएशन आणि रिलायन्स एरोस्पेस लिमिटेड यांच्यात फाल्कन २००० जेट विमानांच्या निर्मितीसाठी ऐतिहासिक करार करण्यात आला आहे. विशेष बाब म्हणजे ही विमाननिर्मिती प्रथमच फ्रान्सच्या बाहेर, थेट भारतात नागपूरच्या मिहान औद्योगिक परिसरात होणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कराराचे स्वागत करत, तो



'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमांच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचे म्हटले आहे.

नागपूर हा सध्या सौर ऊर्जा आणि औद्योगिक क्षेत्रात झपाट्याने प्रगती करत असतानाच, या करारामुळे तो देशाच्या हवाई आणि संरक्षण उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. या करारानंतर भारत फाल्कन २००० जेटसारख्या प्रगत विमाने तयार करणाऱ्या देशांच्या यादीत अमेरिका, फ्रान्स, कॅनडा, ब्राझील यांच्यासोबत सामील होणार आहे.डसॉल्ट रिलायन्स एरोस्पेस लिमिटेड (DRAL) हे नागपूरमधील उत्पादन केंद्र 'सेंटर ऑफ एक्सलन्स' म्हणून विकसित करण्यात येणार आहे. फाल्कन २००० व्यतिरिक्त फाल्कन ८द आणि ६द विमानांचे असेम्ब्ली कार्यही याच ठिकाणी पार पडेल. २०२८ पर्यंत नागपुरात पहिले 'मेड इन इंडिया' फाल्कन जेट तयार होईल, अशी माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.या करारामुळे हजारो तंत्रज्ञ आणि अभियंत्यांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून, यामुळे नागपूर औद्योगिकदृष्ट्या आणखी सक्षम होईल. डसॉल्ट एव्हिएशन ही जगभरात ओळखली जाणारी विमाननिर्माता कंपनी असून, त्यांनी आतापर्यंत १०,००० हून अधिक नागरी आणि लष्करी विमाने तयार केली आहेत आणि सुमारे ९० देशांमध्ये त्यांचा पुरवठा केला आहे. राफेल लढाऊ विमानामुळे चर्चेत असलेल्या डसॉल्टकडून आता नागपूरसारख्या शहरात अशी गुंतवणूक होणे, हे निश्चितच गौरवास्पद आहे.

# अमरावती वरून निघाली पंढरीची सायकल वारी

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१९ अमरावती**

यंदाच्या वारीसाठी राज्यातील विविध २० ठिकाणांहून तीन ते चार हजार सायकलपटू पंढरपूरमध्ये दाखल होणार आहेत. त्यात अमरावती सायकल असोसिएशनचे ३८ सायकलपटूही सहभागी झाले आहेत. त्यात ३३




पुरूष, पाच महिला असून त्यांनी बुधवारी सकाळी पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केले. दररोज १०० ते १५० किमीचे अंतर पार करत हे सायकलपटू २१ जून रोजी पंढरपूरला पोहोचतील. ही सायकलवारी एक सामाजिक बांधीलकी व श्रद्धेचा संगम ठरणार आहे. २२ जून रोजी सकाळी ७ वाजता पंढरपूरच्या रेल्वे ग्राउंडवर भव्य रिंगण सोहळा होणार असून सायकलपटू त्यात सहभागी होणार आहेत. ही सायकलवारी पर्यावरणपूरक, आरोग्यदायी आणि भाविकतेची एक प्रेरणादायी पावले आहेत. पंढरपूर ला या वर्षी सायकल पटूचा रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला आहे

# मेळघाटातील ब्रिटिशकालीन पूल धोकादायक स्थितीत अपघाताची शक्यता : अनेक पूल धोकादायक स्थितीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

पावसाळा सुरू झाला की मेळघाटातील अनेक रस्त्यांची दैनावस्था होते. दऱ्याखोऱ्यांत वसलेल्या मेळघाट परिसरात पुलांवरून पाणी आलं की संपर्क तुटतो. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात मुख्य मार्गावर एकूण ११८ पूल आहेत. यापैकी २० पूल वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक बनले आहेत. काही पूल ब्रिटिशकालीन असल्याने ते अक्षरशः मोडकळीस आले आहेत. अनेक पुलांची पावसामुळे दुरवस्था झालीय. तर अरुंद पूल असल्याने ते धोकादायक ठरताहेत. पुलावरून पाणी वाहत असल्यावर अनेक गावाचा संपर्क तुटतो. त्यामुळे अशा ठिकाणी नव्या पुलांची उभारणी करण्याची मागणी होत आहे.



मेळघाटमध्ये मोठा व्याघ्र प्रकल्प आहे आणि या व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या रस्त्यांचीही प्रचंड दुरवस्था झाली आहे. रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी वनविभागाची परवानगी गरजेची आहे. रस्त्यांच्या दयनीय अवस्थेमुळे मेळघाटातील आदीवासी बांधवांना मोठ्या त्रासाचा सामना करावा लागत असल्याचे आदीवासींचे म्हणणे आहे. या रस्त्यांच्या तातडीने दुरूस्तीची मागणी आता होताना दिसत आहे.

**पर्यटकांनाही करावा लागतो त्रासाचा सामना**

मेळघाटमधील चिखलदरा हे पर्यटनस्थळ विदर्भाचं काश्मीर म्हणून ओळखलं जातं. इथे दरवर्षी लाखो पर्यटक पावसाळ्यात पर्यटनासाठी येत असतात. परंतु परतवाडा ते चिखलदरा या रस्त्याचीही अशाच प्रकारे दुरवस्था झाल्याने पर्यटकांनाही त्रासाचा सामना करावा लागतो.या समस्या कडे सार्वजनिक बांधकाम विभाग लक्ष देणार का ?असा प्रश्न हि आदिवासी बांधव विचारत आहे.

**कालमर्यादा संपल्याचे इंग्लंडवरून पत्र**

अमरावती-अचलपूर-धारणी-बऱ्हाणपूर (म.प्र.) हा जुना मोगलकालीन व नंतर ब्रिटिशकालीन महत्त्वाचा रस्ता. सन १८८३ मध्ये ब्रिटिशांनी हे दोन्ही पूल बांधले. या पुलांचे बांधकाम मुंबई भायखळा येथील रिचर्डसन अ‍ॅण्ड कईस नामक इंजिनिअरिंग कंपनीने केले होते.१०० वर्षे आयुष्य असलेल्या या पुलांची कालमर्यादा संपली. त्याबाबत पत्र इंग्लंडवरून अचलपूरच्या बांधकाम विभागाला १९८३-८४ च्या दरम्यान प्राप्त झाले. त्या पत्रानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २००२ मध्ये आपले लक्ष या पुलांवर केंद्रित केले.

**प्रवासी बस, पर्यटकांची वाहने दरीत**

मेळघाटात रस्त्याच्या कडेला सुरक्षा कठडेसुद्धा आवश्यक आहे. एसटी बस, मध्य प्रदेशातून येणारे मालवाहू ट्रक आणि एक खासगी बस पुलाखाली कोसळल्याने कित्येक अपघात होऊन जीवितहानी झालेली आहे.

# नक्षत्रांच्या वाहनांवरून कसा काढायचा पावसाचा अंदाज? कुठल्या नक्षत्रात सर्वदूर पाऊस?

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

अवकाळी पाऊस खरिपाच्या बाह्य मशागतीसाठी फायद्याचा ठरला. त्याचा फायदा घेत शेतकऱ्यांनी शेताची नांगरणी, वखरणी आटोपली. काहींनी सोयाबीन ,पराटी ची पेरणीही केली.सध्या काही भागात पाऊस सुरु असून काही भागात मृगातील कोल्हा वाहन चकवा देत आहे. आता आर्द्रातील उंदीर सर्वदूर पाऊस घेऊन येणार का, याकडे लक्ष आहे.

२५ मेपासून पावसाचा पहिला नक्षत्र रोहिणीला सुरुवात झाली. मात्र या नक्षत्रात पावसाची फारशी अपेक्षा नसते. परंतु यावर्षी उलटे झाले. या कालावधीत पाऊस झाला. मृग नक्षत्राला ८ जूनपासून सुरुवात झाली. या नक्षत्रात काही भागात जोरदार पाऊस सुरु असून काही भागात हलक्या स्वरूपाचा पाऊस आहे.

जोखीम उचलत काही सोयाबीन ,कापूस,तुरिची लागवड करीत आहे. २२ जूनपासून आर्द्रा नक्षत्राला सुरुवात होणार आहे. या नक्षत्राचे वाहन उंदीर आहे. या नक्षत्रात उर्वरित भागात पुरेसा पाऊस पडेल, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.




### वाहनांवरून कसा काढायचा अंदाज ?

पावसाचा अंदाज घेताना त्या नक्षत्रासाठी असलेल्या वाहनाला फार महत्त्व आहे. वाहनावरून पावसाचा अंदाज शेतकऱ्याला येतो. प्रत्येक वर्षी अंदाजानुसार वाहन बदलत असते, हे विशेष. हत्ती, बेडूक आणि म्हैस ही वाहने असल्यास भरपूर पाऊस पडतो. उंदीर, गाढव, मेंढा हे वाहन असल्यास कमी पाऊस अपेक्षित आहे. तर मोर, कोल्हा, घोडा हे वाहन असल्यास मध्यम पाऊस पडेल, असा अंदाज असतो.

### आवत्याकडे वाढला कल

अवकाळी पावसामुळे शेतजमिनीची मशागत करण्यास शेतकऱ्यांना बराच वेळ मिळाला. त्यामुळे आवत्या पद्धतीने पेरणी करण्याकडे शेतकऱ्यांची अधिक पसंती आहे. सदर पद्धतीने धानाची पेरणी केल्यास उत्पादन खर्च कमी येतो आणि उत्पादन रोवणी पद्धतीच्या प्रमाणेच येतो, असा आता अनुभव असल्याने या वर्षात मोठ्या प्रमाणे आवत्या पद्धतीने पेरणी होत आहे.

# आता बियाणे आणि कीटकनाशके यांच्याशी संबंधित कायदे आणखी कडक करणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नवी दिल्ली**

'विकसित कृषी संकल्प अभियाना'दरम्यान शेतकऱ्यांनी बियाणे व कीटकनाशके यांच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त केली होती.

त्यामुळे आता बियाणे आणि कीटकनाशके यांच्याशी संबंधित कायदे आणखी कडक करण्यात येतील, अशी घोषणा केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी बुधवारी केली.

कृषी सचिव देवेश चतुर्वेदी यांनी सांगितले की, कृषी मंत्रालय बनावट बियाणांबाबत काठोर कायदा करणार असून, या अंतर्गत गुन्ह्यांसाठी दंड कसा वाढवायचा यावर विचार करत आहे.बियाणे कायदा, १९६६ मध्ये एक वर्षाच्या आत योग्य ते बदल केले जातील. तसेच बनावट कीटनाशकांची विक्री रोखण्यासाठी कीटनाशक कायदा, १९६८ मध्ये सुधारणा केल्या जातील.

७२१ जिल्ह्यांच्या १.४३ लाख गावांतील १.३४ कोटी शेतकऱ्यांशी संपर्क साधला. ८,२८० शास्त्रज्ञ आणि २,१७० पथके देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियानात होती. ६०,२८१ कार्यक्रमांचे आयोजन देशभरात करण्यात आले होते.

**प्रगतिशील शेतकऱ्यांना करणार लोकप्रिय**

चौहान यांनी सांगितले की, आम्हाला शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात सूचना मिळाल्या. कृषीविषयक योजना आणि धोरणे ठरवताना त्यांचा उपयोग केला जाईल. प्रगतिशील शेतकऱ्यांचे उपक्रम लोकप्रिय केले जातील.

**शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याची सक्ती**

चौहान यांनी सांगितले की, कृषी विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ आठवड्यातून तीन दिवस शेतकऱ्यांच्या शेतांना सक्तीने भेट देतील. मी आठवड्यातून दोन दिवस शेतकऱ्यांच्या शेतांवर जाईन. मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनाही अशाच सूचना देण्यात आल्या आहेत.

# राज्यातील शाळांमध्ये होणार मोबाईल बंदी? शिक्षक सुधीर केनेंचे संशोधन : आ. सुमित वानखेडे लावणार लक्षवेधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

देशातील भावी पिढीचे भवितव्य उज्वल करायचे असेल शाळांमध्ये मोबाईल बंदी करणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकारच्या शाळांमध्ये विद्यार्थ्याच्या मोबाईल वापरावर बंदी यावी याकरिता आर्वी मतदार संघाचे आमदार येत्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी मांडणार आहे. विशेष म्हणजे आ.वानखेडे यांनी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांचेशी पत्रव्यवहार करून मोबाईल बंदी करण्याबाबत विनंती केली आहे. अमरावती जिल्ह्यातील शिक्षक सुधीर केने यांच्या संशोधनाची दखल घेत त्यांनी हा निर्णय घेतला आहे.

अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यातील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालयाचे माध्यमिक शिक्षक सुधीर पंजाबराव केने यांनी मोबाईल बंदी संदर्भात संशोधन केले आहे. गत पाच वर्षापासून त्यांनी विद्यार्थ्यांच्या वर्तनाबाबत नोंदी घेतल्या असून या बाबत बालरोग तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, नेत्र तज्ज्ञ, अस्थी रोग तज्ज्ञ, मेंदू विकार



तज्ञांच्या मुलाखती घेतल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या मोबाईलच्या व्यसनामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात कॅन्सर, मानदुखी, विसरभोळेपणा, चिडचिडेपणा, अंधत्व, चक्कर येणे अश्या अनेक आजाराची झपाट्याने लागण होत असल्याचे तज्ज्ञ डॉक्टरांचे मत आहे. या सर्वांमुळे नवीन पिढीचे भवितव्य धोक्यात आले आहे.

मोबाईल वरील गेम, सोशल मीडियाच्या अती वापराने विद्यार्थी हिंसक बनली आहे. परदेशप्रमाणे अमरावतीच्या विद्यार्थ्यांच्या दफ्तरमध्ये बंदूक आढळून आल्याची घटना नुकतीच गाजली आहे. आश्ट्रेलियासारख्या प्रगत देशाने विद्यार्थ्यांना सोशल मीडियावर बंदी घालून संसदेत कायदा पारित केला आहे. बोहरा समाजाने सुध्दा मुलांच्या मोबाईल वापरावर बंदी घातली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील शाळांमध्ये मोबाईल बंदी यावी यासाठी सुधीर केने यांनी आ.सुमित वानखेडे तसेच मुख्यमंत्री यांचेशी पत्रव्यवहार केला आहे. या पत्राची दखल घेत आ. सुमित वानखेडे येत्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**शासनाकडून नवोपक्रमाची दखल**

सुधीर केने यांनी त्यांच्या शाळेतील इयत्ता ५ ते १२ वी विद्यार्थ्यांवर मोबाईल बंदी करून संशोधन केले. त्यांना विद्यार्थ्यांच्या आळस कमी होऊन गुणवत्ता वाढीस लागल्याचे दिसून आले आहे. या नवोपक्रम दखल राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी घेत सुधीर केने यांना सन्मानित केले आहे.